वार्षिक अहवाल २००८-२००९

# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**वीज निर्मिती पिढयान् पिढया**

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल २००८-२००९

# वार्षिक अहवाल २००८-२००९

## अनुक्रमणिका


| तपशील | पान क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | १ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | २ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षकांच्या अहवालाला उत्तर | ५ |
| लेखा परिक्षकांच्या अहवाल | ९ |
| सूचना (वार्षिक सर्वसाधारण सभा) | १६ |
| संचालक मडंळाचा अहवाल | २० |
| लेखा परिक्षकांच्या अहवालातील बाबींचा खुलासा | ४३ |
| आर्थिक ताळेबंद | ५२ |
| नफा-तोटा विवरण | ५३ |
| ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची | ५४ |
| हिशेब तक्त्यावरील टीपा | ६३ |
| रोकड प्रवाह विवरण | ९१ |
| कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२ (३) प्रमाणे विवरण | ९५ |
| आगामी प्रकल्प | ९६ |


महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## संचालक मंडळ

**(१-०४-२००८ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)**

**श्री. पी. अब्राहम**

अध्यक्ष

(२९-०७–०५ पासून)

| | |
|---|---|
| व्यवस्थापकीय संचालक | **श्री. अजय मेहता** (०२-०२–०९ पर्यंत) |
| | **श्री. सुब्रत रथो** (०२-०२–०९ पासून) |
| संचालक (वित्त) | **श्री. जी.जे. गिरासे** (०१-०६-०७ पासून) |
| संचालक (संचलन) | **श्री. व्ही.टी. बापट** (२६-११-०७ पर्यंत) |
| | **श्री. एम्.आर. शेलार** (२७-११-०७ पासून) |
| संचालक (प्रकल्प) | **श्री. व्ही.टी. बापट** (२७-११-०७ पासून १३-०३-०९ पर्यंत) |
| | **श्री. सी.एस्. थोटवे** (३१-०८-०९ पासून) |
| संचालक | **श्री. पी.व्ही. पागे** (०१-१२-०८ पासून) |

## भारताचे नियंत्रक व महालेखापालांचे कंपनी कायदा १९५६ च्या उपविभाग ६१९ (४) च्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांचे वर्ष अखेर ३१ मार्च २००९ चे लेख्यांबद्दल भाष्य.

**महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई** यांचे वर्ष अखेर ३१ मार्च २००९ चे वित्तीय पूरक पत्र हे कंपनी कायदा, १९५६ च्या वित्तीय चौकटीच्या अहवालाप्रमाणे तयार करण्यात यावा ही कंपनी व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापालांद्वारे उपविभाग ६१९ (२) च्या अंतर्गत नेमणूक करण्यात आलेले सांविधिक लेखापरिक्षकांची जबाबदारी कंपनी कायदा १९५६ च्या उपविभाग २२७ अंतर्गत वित्तीय पूरकपत्रावर मत प्रदर्शित करण्यापूर्ति असते. ही पूरकपत्रे भारताचे सनदी लेखा संस्थाच्या लेखापरिक्षण आणि विमायोजन मानकाच्या अंतर्गत स्वतंत्रपणे अंकेक्षित करण्यात आली असावी असे सांविधिक लेखापरिक्षक तपासून घेतात.

असे ठराव देण्यात येते की, सांविधिक लेखापरिक्षकांच्या दि.२५ नोव्हेंबर २००९ च्या लेखापरिक्षण पत्रक अनुसार सांविधिक लेखापरिक्षकांनी याचा तपास केलेला आहे.

मी, भारताचे नियंत्रक व महालेखापालच्या वतीने कंपनीकायदा १९५६ च्या उपविभाग ६१९ (३) (बी) अनुसार **महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई** चे वर्ष अखेर ३१ मार्च २००९ चे वित्तीय परिपत्रक पूरक लेखापरिक्षित करून घेतले आहे. सांविधिक लेखापरिक्षकांच्या कार्यकारी कागदांमध्ये शिरकाव न करता हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले आहे आणि हे, सांविधिक लेखापरिक्षक आणि कंपनी व्यवस्थापन व काही निवडक लेखांकन पत्रकांच्या प्राथमिक तपासणी पूर्ते मर्यादित आहे.

माझ्या पुरक लेखा तपासणीच्या अनुषंगाने मी कंपनीकायदा १९५६ च्या उपविभाग ६१९ (४) च्या अंतर्गत खालील काही महत्त्वपूर्ण बाबीं ठळकपणे निदर्शनास आणू इच्छितो, जे मला लक्षात आले आणि जे माझ्या मते वित्तिथ पूरकपत्र व लेखा पत्रकाला व्यवस्थितपणे समजण्यासाठी गरजेचे आहे.

**अ) नफा /फायदेशीरपणा यावर टिप्पणी**

**नफा व तोटा उत्पन्न पत्रक**

**वीज विक्रीपासून मिळालेला महसूल रु.९३४६.९०**

१. वीज विक्री महसूलात वीज विक्रीतून येणारे वादग्रस्त रु. ३२.२४ कोटी दाखवले आहेत ज्यात महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित ला केलेली देयके धरली असून त्याबाबत समेट चर्चा सुरु आहे. त्यांचे पैसे दिले नाहीत अशा वादग्रस्त देयकाचे येणे हिशेबात धरणे गैर आहे. म्हणून फायदा रु.३२.२४ कोटीने अधिक दाखवला आहे.

**खर्च**

**निर्मिती, व्यवस्थापन आणि इतर खर्च रु.८७४.९३ कोटी**

२. यांचे वर्णन असे करता येईल,

अ) २४ व्हीसीडी बॅटरी सेट बदलण्यासाठी लागलेली किंमत रु.२.०३ कोटी जी भांडवली खर्च दर्शविला असून तिचे स्वरूप महसूलीचे आहे. (खापरखेडा औ.वि.कें)

ब) खापरखेडा औ.वि.कें येथील संच १ आणि २ येथील सर्विस कंट्रोल व्हॉल बदलण्याची किंमत रु.१.३९ कोटी इतकी असून ती भांडवली खर्च म्हणून गणण्यात आली आणि तिचे भांडवलीकरण करण्यात आले जरी या निर्वाह खर्च महसूलीचे आहे. या सर्वांचा परिणाम मालमत्ता व नफा रु.३.४२ कोटी असा वाढवून दाखवण्यात आला आहे.

**इंधनाचे मोल रु.७१५६.२५ कोटी**

३. याचे वर्णन असे करता येईल.

अ) ओएन्जीसी ला देणे असल्यास रु.०.७९ कोटीच्या किंमतीतील फरकासाठी तरतूद नसल्यामुळे. (वा. औ.वि.कें)

ब) परळी येथील औष्णिक वीज केंद्राकडून दक्षिण मध्य रेल्वेला कोळसा वाहतुकी बद्दल ३१.०३.२००९ पर्यंत देणे असलेले रु.८.२१ कोटीचा समावेश न केल्यामुळे.

वरील बाबींमुळे चालू देये व तरतुदी कमी झाल्या असून रु.९ कोटींचा नफा झाल्याचे दिसत आहे.

**ब) वित्तीय स्थितीबद्दल शेरा**

**चालू मालमत्ता, कर्जे आणि आगाऊ (अनुसूची ६)**

**किरकोळ रु.८२५.४३ कोटी**

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

४ **अ)** वर दिलेली रक्कम रु.४८.८४ कोटीने अधिक असून जी ३०.३.२००९ रोजीपर्यंत चंद्रपुर औ.वि. कें मध्ये पडून असलेल्या सुट्टया भागांची भांडवल किंमत असून कंपनीच्या धोरणानुसार तिचे भांडवलीकरण व्हायला हवे. यामुळेस्थावर मालमत्ता मध्ये कमतरता जाणवते. याचा परिणाम म्हणजे घसाऱ्याचे भांडवलीकरण, नफा आणि स्थावर मालमत्ता यासंबंधी संपूर्ण माहिती खात्रीलायकरीत्या देता येत नाही. (चंद्रपुर औ.वि.कें.)

**ब)** बाष्प चक्र जनित्र देखभाल विभागाची अंतिम शिल्लके मधील रु.३.११ कोटीची कमतरता दिसते आहे. (खापरखेडा औ.वि.कें.) याचा परिणाम म्हणजे संबंधित नफा हा कमी दिसतो आहे.

**क)** चौकशी अंती असे आढळून आले की, प्रत्यक्ष पाहणीनंतर रु.६.०५ कोटी मूल्य असलेली अतिरिक्त साधन सामग्रीचा (ज्यात खापरखेडा औ.वि.कें. येथील रु.५.२९ कोटीचा त्याज्य कोळश्याच्या व चंद्रपुर औ.वि.कें मधील रु. ०.७६ कोटीचा किरकोळ वस्तूचा समावेश आहे) लेख्यांमध्ये समावेश केलेला नाही. कमी असलेल्या अथवा अतिरिक्त साठ्याची व्यवस्था लावण्याची प्रक्रिया हिशोबांच्या सूचीमध्ये स्पष्टपणे नमूद केली गेलेली नाही.

**कर्जे आणि आगाऊ रकमा रु.५८.४९ कोटी**

५. वरील आगाऊ रक्कमांमध्ये मेळ न झालेल्या, ३ वर्षापासुन प्रलंबित असलेल्या रु. ८.४४ कोटींचा समावेश आहे.

**क) हिशोब तपासनीसांच्या अहवालावर शेरा**

हिशोब क्र.१ (म) ची अनुसूची १५ चा भाडेपट्टा वित्तीय उप-परिच्छेद एक ज्यात म्हटले आहे जी मालमत्ता (महाराष्ट्र वीज सुधारीत हस्तांतरण योजना) २००५ (हस्तांतरण योजना) अन्वये भाडेपट्टीवर आर्थिक निधी सहाय्याने मिळविली जाते. त्या मालमत्तेच्या भाडेपट्टीची रक्कम जेव्हा देय असेल तशी नफा-तोटा पत्रकावर दाखविली जाते.

संविधिक हिशेबनीसांची वित्तीय भाडेपट्टा हा कृतीप्रणव (ऑपरेटींग) भाडेपट्टा म्हणून ग्राह्य धरून, त्याचे विस्तृत वर्णन तसेच वित्तीय भाडेपट्टयांच्या संदर्भातील तरतुदींना न अनुसरता व त्याच्या वित्तीय नोंदीत होणारा परिणाम गुणदर्शक तसेच परिणामदर्शक दाखवलेले नाही.

ठिकाण : मुंबई

महानियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांच्या वतीने

दिनांक :

मुख्य महालेखा परिक्षक

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# वित्तीय वर्ष २००९-१०साठी हिशेब मांडणीवर सरकारी हिशेब तपासनीसांचे शेरे व महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित चे खुलासे

| अ. क्र. | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| अ) | नफा दायकतेबद्दल भाष्य | | |
| | नफा व तोटा हिशोब (उत्पन्न) | | |
| | १. वीज विक्री महसूल रु. ९३४६.९० कोटी या महसूलात वीज विक्रीतून येणारे वादग्रस्त रु. ३२.२४ कोटी दाखवले आहेत ज्यात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी म. ला केलेली देयके धरली असून त्याबाबत समेट चर्चा सुरू आहे. त्यांचे पैसे दिले नाहीत अशा वादग्रस्त देयकाचे येणे हिशेबात धरणे गैर आहे. म्हणून फायदा रु. ३२.२४ कोटीने अधिक दाखवला आहे. | रु. ३२.२४ कोटीचा फरक हा मुख्यत्वे जळण तडजोड खर्च बिलांमुळे असून त्याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित बरोबर समेट चर्चा सुरू आहे. या फरकाची नोंद (असल्यास) समेट चर्चेनंतर दाखवली जाईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| ब) | खर्च | | |
| | २. निर्मिती व्यवस्थापन आणि इतर खर्च रु. ८७४.९३ कोटी याचे सौम्यपणे असे वर्णन करता येईल | | |
| | अ) २४ व्हीडीसी बॅटरी सेट बदलण्यासाठी लागलेली किंमत रु. २.०३ कोटी जी भांडवली खर्च असून जरी तिचे स्वरुप महसूलीचे आहे. (खापरखेडा औ.वि.कें.) | या बाबीमध्ये नव्या बॅटरींची कंपनीचे भांडवलीकरण व्हायला हवे आणि जुन्या बॅटरींच्या किंमती मालमत्तेतून वजा करायला हव्यात. या संदर्भातील नोंदी दैनिक पावती क्रं. ११६ दि. ३१/३/२०१०नुसार मालमत्तेमधून जुन्या बॅटरी बाद करून महसूल खर्चातून ती किंमत घालवली आहे | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ब) | खापरखेडा औ.वि.कें. येथील संच १ आणि २ येथील उपयोग नियंत्रण पडदा बदलण्याची किंमत रु. १.३९ कोटी इतकी असून ती भांडवली खर्च म्हणून गणण्यात आली आणि तिचे भांडवलीकरण करण्यात आले जरी या निर्वाह खर्च महसूलीचे आहे. या सर्वांचा परिणाम मालमत्ता व नफा रु. ३.४२ कोटी आहे असा वाढवून दाखवण्यामध्ये झाला आहे. | या बाबतीत कंट्रोल व्हाल्व खर्च जिचे भांडवलीकरण केलेली मागे घेण्यात आले असून दैनिक पावती क्रं. २३५ दि. ३१/३/२०१० नुसार रक्कम महसूल खर्चात दाखवली आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| | इंधनाचे मोल रु. ७१५६.२५ कोटी | | | | |
| | ३. | **याचे सौम्यपणे असे वर्णन करता येईल.** | | | |
| | | अ) | ओएन्जीसी ला देणे असलेल्या रु. ०.७९ कोटीच्या किंमतीतील फरकासाठी तरतूद नसल्यामुळे | वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये जानेवारी २०१० च्या दैनिक पावती १८ प्रमाणे नोंदीत योग्य त्या दुरुस्त्या करण्यात आल्या. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| | | ब) | परळी औष्णिक वीज केंद्राकडून दक्षिण मध्य रेल्वेला कोळसा वाहतुकी बद्दल ३१.०३.२००९ रोजीपर्यंत देणे असलेले रु. ८.२१ कोटी चा समावेश न केल्यामुळे वरील बाबींचे चालू देये व तरतुदी कमी झाल्या असून रु. ९ कोटींचा नफा झाल्याचे दिसत आहे. | वित्तिय वर्ष २००९-१० मध्ये आवश्यक त्या नोंदीची व्यवस्था करण्यात येईल. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| | ४. | **वित्तीय स्थितीबद्दल शेरा**<br>चालू मालमत्ता, कर्जे आणि आगाऊ रकमा (अनुसूची ७) किरकोळ वस्तूंची सविस्तर यादी रु. ८२५.४३ कोटी | | | |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ४. | अ) | वर दिलेली रक्कम रु. ४८.८४ कोटी ने अधिक असून जी ३०/३/२००९ रोजीपर्यंत चंद्रपुर औ.वि.कें. मध्ये पडून असलेल्या सुट्टया भागांची भांडवल किंमत असून कंपनीच्या धोरणानुसार तिचे भांडवलीकरण व्हायला हवे. यामुळे स्थावर मालमत्ता मध्ये कमतरता जाणवते. याचा परिणाम म्हणजे घसाऱ्याचे भांडवलीकरण, नफा आणि स्थावर मालमत्ता यासंबंधी संपूर्ण माहिती खात्रीलायकरित्या देता येत नाही (चंद्रपुर औ.वि.कें.) | संचानुसार आणि मालमत्तेनुसार सुट्या भांडवली भागांचे घसारामुल्यांचे हिशोब करण्याचे काम चालू आहे आणि यासंदर्भातील आवश्यक त्या हिशोबांच्या नोंदी वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये मंजूर केल्या जातील. | आम्ही व्यवस्थापनाच्या मतांशी सहमत असून ते लेखा अहवाल परिच्छेद क्रं. ४ (iv) मध्ये मान्य केले आहे. |
| | | ब) | बी.एम् खंडाच्या अखेरचे भांडवल मधील रु. ३.११ कोटीची कमतरता दिसते आहे. (कोराडी औ.वि.कें.) याचा परिणाम म्हणजे संबंधित नफा हा कमी दिसतो आहे. | दैनिक पावती क्रं. ३५ दि. ३१/१/२०१० नुसार आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या आहेत. | बी.एम् खंड मधील प्रत्यक्ष किरकोळ वस्तूंची किंमत रु. ५.८७ कोटी असल्याचे आम्हांला सांगण्यात आले ज्यावर आम्ही विश्वास ठेवला. |
| | | क) | चौकशी अंती असे आढळून आले की, प्रत्यक्ष पाहणीनंतर रू. ६.०५ कोटीची मूल्य असलेली वस्तूंची सविस्तर यादी (ज्यात कोराडी औ.वि.कें.) येथील रु. ५.२९ कोटीचा आणि ०.७६ कोटी चंद्रपूर औ.वि.कें. त्यात कोळशाच्या किरकोळ वस्तूंचा समावेश आहे) आहेत.<br><br>कमी असलेल्या अथवा अतिरिक्त साठ्याशी व्यवस्था लावण्याची प्रक्रिया हिशोबांच्या सूचीमध्ये स्पष्टपणे नमूद केली गेलेली नाही. | छाननीनंतर असे मत व्यक्त करण्यात आले की दैनिक पावती क्रं. ३४ दि. ३१/०१/२०१० नुसार रु. ५.२९ कोटी ऐवजी रु. २.८५ कोटीची रक्कम हिशेबात ग्राह्य धरली जावी.<br><br>प्रत्यक्ष पाहणीनंतर आढळलेल्या रु. ०.७६ कोटीच्या अतिरिक्त सामग्रीबाबत निर्णय घेण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीनंतर आवश्यक त्या हिशोबाच्या नोंदी केल्या जातील. | आम्हांला दिलेल्या माहितीनुसार त्या मुद्याची चौकशी सुरु असून समेटानंतर पुस्तकात नमुद केलेला साठा व प्रत्यक्ष साठा यांच्यात काही फरक असला तर तो २००९-१० च्या हिशोबात ग्राह्य धरला जाईल.<br><br>आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ५. | **कर्जे आणि आगाऊ रकमा: रु. ५८.४९ कोटी** | | |
| | | वरील शीर्षकात समाविष्ट बसणारी रु. ८.४४ कोटी ही रक्कम पुरवठा दारांना केलेली वादग्रस्त आगाऊ रक्कम असून तीन वर्षाहून अधिक काळापासून ती प्रलंबित आहे. (चंद्रपुर औ.वि.कें.) | रु. ८.४४ कोटीची बुडीत आगाऊ रक्कम नाही. त्याच्या बदल्यात पुरवठादारांकडून काही माल मिळालेला आहे व दायित्व निर्मिती केल्या गेल्यात. वर नमूद केलेल्या आगाऊ रकमांच्या बदल्यात 'भेल' कडून माल अजून यायचा आहे. कारण अजून निर्मिती प्रक्रिया सुरु आहे. त्याचप्रमाणे जुन्या संग्रह प्राप्ती माहितीपत्रक काढुन टाकण्याची प्रक्रिया सुरु असून आतापर्यंतची रु. २.९६ कोटीची आगाऊ रक्कम जाने २०१० पर्यंतच्या वित्तीय वर्ष २००९-१० च्या हिशोब पुस्तकात समायोजित केली गेली आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |
| | ६. | **हिशोब तपासनीसांच्या अहवालावर शेरा** | | |
| | | बाब क्रं. १ (म) ची अनुसूची १५ चा भाडेपट्टा वित्तीय उपपरिच्छेद १ ज्यात म्हटले आहे 'जी मालमत्ता भाडेपट्टीवर आर्थिक निधी सहाय्याने मिळवली जाते (महाराष्ट्र वीज सुधारित हस्तांतरण योजना) त्या भाडेपट्टीच्या भाड्याची रक्कम जेव्हा मिळेल तशी नफा-तोटा पत्रकावर दाखविली जाते.<br><br>संविधिक हिशेबनीसांची वित्तीय भाडेपट्टा हा कृतीप्रणव (ऑपरेटींग) भाडेपट्टा म्हणून ग्राह्य धरून, त्याचे विस्तृत वर्णन तसेच वित्तीय भाडेपट्यांच्या संदर्भातील तरतुदींना न अनुसरता व त्याच्या वित्तीय नोंदीत होणारा परिणाम गुणदर्शक तसेच परिणामदर्शक दाखवलेला नाही. | महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या कारकिर्दीत खापरखेडा वीज केंद्रात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या भाडेपट्टा तत्वानुसार राख हाताळणी संच उभारण्यात आला. त्यावेळी ही मालमत्ता म.रा.वी.मं. च्या पुस्तकात नोंदली गेली नाही. म.रा.वी.मं. नंतर खापरखेडा औ.वि. कें.चा एक भाग असलेला हा यंत्रसंच म. रा.वी.नि.कं.म. कडे आला. त्यामुळे म.रा. वि.नि.कं.म. स्टेट बँक ऑफ इंडियाला भाडेपट्टी देत आहे. ज्यामुळे ही मालमत्ता निर्मिती केलेली नाही. आणि हस्तांतरण जरी आर्थिक भाडेपट्टयाच्या स्वरूपात असली तरीही भाडेपट्टा आकारणी नफा तोट्यात असल्यामुळे ते कृतीप्रणव (ऑपरेटींग) भाडेपट्टा म्हणून ग्राह्य धरण्यात यावं. त्याचप्रमाणे मालमत्तेचे योग्य मूल्य आकारण्यात यावे असं नाही. अशा प्रकारच्या भाडेपट्टयाची हाताळणी कशी केली आहे याचे वर्णन हिशोबाच्या नोंदीमध्ये करण्यात आले आहे | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत. |

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादितचे सभासद, यांना सादर केलेला लेखा परिक्षकांचा अहवाल.

१) सोबतचा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा ताळेबंद हिशेब तक्ता ३१ मार्च, २००९ पर्यंतच्या कालावधिचा आहे व नफा नुकसानीचा हिशेब तक्ता, जो त्याच तारखेला संपणाऱ्या वर्ष अखेरीचा आहे. तसेच रोकड प्रवाह तक्ता त्यावर उल्लेखिलेल्या वर्ष अखेरीसाठी आहे. ही सर्व कागदपत्रे व लेख आम्ही तपासले आहेत. आर्थिक व्यवहारासंबंधी ही हिशेब मांडणीची जबाबदारी पूर्णत: कंपनी व्यवस्थापनाची असून, आमची जबाबदारी त्यावर मत प्रदर्शन करण्यापुरती आहे. त्या मतप्रदर्शनास आमची तपासणी (ऑडिट) हा मुख्य आधार आहे.

२) भारतात सर्वसाधारणत: मान्यताप्राप्त अशा दर्जानुसार हे लेखापरिक्षण केलेले आहे. त्या मान्यताप्राप्त दर्जानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण हे पुरेशी, खात्रीलायक आर्थिक व्यवहारासंबंधी माहिती, तपशील मिळवून, तो तपशील कुठल्याही प्रकारचा संशयास्पद व्यवहार दाखवित नाही हे तपासतो. हे सर्व प्रकारचे आर्थिक तक्ते तयार करणे ही सर्वोतोपरी आस्थापन (कंपनी) व्यवस्थापनाची जबाबदारी असते. लेखा परिक्षणातंर्गत नमुन्यादाखल तक्त्यात दाखविलेले काही खर्च इत्यादिंची सत्यता पडताळून पाहणे, त्याचप्रमाणे लेखा परिक्षणातंर्गत लेखा तक्ते उभारणीत वापरलेली पद्धती ही मान्यताप्राप्त अशीच असल्याची खात्री करून घ्यायची असते. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाने एकंदरीतपणे आपले लेखा तक्ते सुयोग्य पद्धतीत सादर केले आहेत ना? हे पण तपासायचे असते. आमचा असा विश्वास आहे की, आमचे लेखा परिक्षण आम्ही दिलेल्या मतांसाठी पुरेसे व सुयोग्यपणे आधारभूत आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

३) अ) कंपनी कायदा (लेखा परिक्षण अहवाल) २००३ यातील हुकुमान्वये, तसेच (कंपनी कायदा लेखा परिक्षण अहवाल), (सुधारित हुकुम २००४) जे भारताच्या केंद्र सरकारने प्रकाशित केले त्याच्या उपखंड ४ (अ) मूळ कलम २२७ कंपनी कायदा १९५६, च्या हुकुमातील परिच्छेद ४ व ५ यात सांगितलेले संबंधित विषयाचे तक्ते सोबत जोडत आहोत.

ब) कंपनी कायदा १९५६, यांच्या उपनिर्देशांतर्गत खंड ६१९(३)(अ) व महालेखापाल (व्यावसायिक लेखा परिक्षण महाराष्ट्र) यांच्या ७ जुलै, २००९ चे पत्र क्रं. ए.जी/सी ए/सी ए डब्ल्यू-I / एफ - ३८१३ यांच्या संमती नुसार आम्ही हिशेब टीपातील टीप क्रं. २५, जी पूर्वोक्त उप निर्देशनानुसार माहिती उघड करते, त्याच्या उपलब्धतेप्रमाणे संदर्भ घेतला आहे.

४) वर उल्लेखिलेल्या पुरवणीमधील आमची टिप्पणी व्यतिरिक्त आम्ही असे नमुद करीत आहोत की:

(१) आमच्या लेखा परिक्षण प्रक्रियेच्या पूर्ततेसाठी आम्ही सर्व प्रकारचे खुलासे, शंकानिरसन, कंपनी व्यवस्थापनाकडून मिळवलेली आहेत.

(२) आमच्या पाहणी परिक्षेत आढळून आल्याप्रमाणे आम्ही असे नमूद करतो की कंपनी कायद्यानुसार हिशेबाच्या सुयोग्य पद्धतीची पुस्तके/दप्तर इत्यादी या कंपनी व्यवस्थापनाने तयार करून ठेवली आहेत.

(३) ताळेबंद पत्रक, महसूल जमा व व्यय यांचे पत्रक तसेच रोकड प्रवाह पत्रक जी या लेखा परिक्षणासाठी आमचे समोर आली ती या लेखा दफ्तरांशी मिळती जुळती आहेत असे दिसून आले आहे.

(४) आमच्या मते या अहवालातील ताळेबंद पत्रक, नफा-तोटा हिशेब आणि रोकड प्रवाह पत्रक ही १९५६ च्या आस्थापन कायदा खंड २११ च्या उपखंड (३सी) च्या लेखा दर्जाच्या संदर्भात स्विकार संमत आहेत. परंतु यादीत समाविष्ट केलेल्या लेखा धोरण क्र. १(एफ) मधील यंत्रणा भागच्या धोरणाला भांडवलिकृत करून त्यांच्या किंमतीचे अवमूल्यन ठरवून, संबंधित उर्वरित जीवनापर्यंत करायला हवे होते, मात्र कंपनीने या धोरणाला स्वीकारले नाही आणि पुढे ही किंमत अवमूल्यन स्थायी मालमत्ता यांच्या लेखा मानक ६ आणि लेखा मानक १० यानुसार अनुसरले नाही. अशा शिल्लक यंत्रणाच्या रकमेबद्दल कंपनीमध्ये खात्रीलायक माहिती नाही.

(५) सरकारी अधिसूचना क्रं. जी.एस.आर. (८२९/(ई) दिनांक २१/१०/२००३ मधील सूचनेनुसार सरकारी आस्थापने यांना कंपनी कायदा १९५६ च्या कलम २७४ १(जी) यातील कलमातून सूट देण्यात आली आाहे.

(६) अनुसूची १५ मधील हिशेब तक्त्यावरील टीपेमधील टीप क्रं. २३ मध्ये पारस संच क्रमांक ३ आणि परळी संच क्र.६ मधील वीज विक्रीतून झालेल्या उत्पन्नाकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

(७) अ) दिनांक ६ जून २००५ या काळापर्यंत कंपनीची “स्थायी मालमत्ता” व “उत्तरदायित्वे (ॲसेटस व लायबिलिटीज्)” ही महाराष्ट्र वीज सुधारणा स्थानांतरण योजना २००५ च्या अंतर्गत निवेदन केल्यानुसार आहेत. आम्हाला सूचित केल्याप्रमाणे या सर्व शिल्लकी रकमा (बॅलन्सेस) महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनीने स्व:तचे अखत्यारीत धरलेल्या आहेत. या शिवाय पुढे असेही निवेदित करण्यात आले आहे की, अंतिम स्थानांतरण योजना (फायनल ट्रान्स्फर स्कीम) ही महाराष्ट्र सरकार कडून अद्यपि जारी केली गेलेली नाही. यास्तव कंपनीच्या ताळेबंद पत्रकात यासंबंधीची शिल्लकी रकमेची नोंद झालेली नाही. यात भविष्यकालीन होणारे बदल (जर काही झाले तर) हे कंपनीच्या आर्थिक पत्रकावर भरीव परिणाम करणारे ठरू शकतील. कंपनी हस्तांसंबंधी अनुसूची १५ टिप्पणी क्रमांक २ याकडे आम्ही लक्ष वेधीत आहोत. ही टिप्पणी कंपनी स्थानांतरण प्रक्रियेच्या मागील वर्षामधील कर्जदायित्त्व संबंधी असून त्यात चढणाऱ्या व्याजाचा अंर्तभाव आहे. सुत्रधार कंपनी (म.रा.वि.मं.) ने मान्यता दिल्यानुसार वरील सुधारित स्थानांतरण योजने अंतर्गत अशी ही बाब आहे.

ब) किरकोळ येणी (देणेकरी), किरकोळ देणी (घेणेकरी), कर्जे आणि आगाऊ रक्कमा व इतर येणाऱ्या सर्वांची शिल्लक व इतर देय / श्रेय, शिल्लक रकमा, सुत्रधारी कंपनीच्या धरून व सुत्रधार कंपनीच्या इतर सहाय्यक कंपन्या यांच्याही देय / श्रेय, शिल्लक रकमा या सर्व ताडून जुळविणे बाकी आहे या जुळवणीचा परिणाम म्हणून नफा / नुकसान तक्त्यात काय बदल घडू शकेल हे सांगता येत नाही.

आमच्या उपरोक्त परिच्छेद ४(४) आणि ४(७) या परिच्छेदातील टिप्पणी प्रमाणे व आमच्या मतानुसार, आमच्याकडे उपलब्ध सुयोग्य माहितीनुसार आणि आम्हाला कंपनीकडून मिळालेल्या खुलाशाप्रमाणे वरील हिशेब (तक्ते) त्यावरील टिपा सहीत वाचले असता कंपनीकायदा १९५६, अनुसार आवश्यक माहिती देणारे ठरतात व ज्यापद्धतीने मांडणी आवश्यक आहे तशी ती झालेली आहे. या मांडणीवरून कंपनीच्या आर्थिक व्यवहाराचे खरेखुरे चित्र भारतात सर्वत्र स्विकृत केलेल्या मान्यता प्राप्त पद्धतीनुसार झाले आहे व त्यात खालील मांडणी समाविष्ट आहे.

अ) ताळेबंद तक्त्यात कंपनीच्या ३१ मार्च २००९ पर्यंतच्या व्यवहाराचे चित्रण प्रतीत होते.

ब) नफा नुकसान तक्त्यामध्ये या तारखेला संपलेल्या वर्षात झालेला नफा आणि

क) रोकड प्रवाह तक्त्यानुसार या तारखेला संपलेल्या वर्ष अखेरीस असलेली स्थिती दाखवतात.

| | | |
|---|---|---|
| **मेसर्स फोर्ड, ऱ्होडस्, पार्कस्** | **मेसर्स पी. जी. भागवत** | **मेसर्स पी.जी. जोशी** |
| **आणि कंपनीकरिता** | **कंपनीकरिता** | **आणि कंपनीकरिता** |
| सनदी लेखापरिक्षक | सनदी लेखापरिक्षक | सनदी लेखापरिक्षक |
| सही /- | सही /- | सही /- |
| **एस.बी.प्रभू** | **एस.एस. आठवले** | **सुधीर पी. तिडके** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| एम् क्रं. ३५२९६ | एम् क्रं. ८३३७४ | एम् क्रं. ०३९३६२ |
| सं. क्रं. | सं. क्रं | सं. क्रं. |

ठिकाण: मुंबई
दिनांक: २५ नोव्हें, २००९

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## आमच्या समतारखेच्या अहवालामधील परिच्छेद ३ मध्ये उल्लेख केलेले पूरक पत्रक (अॅनेक्चर)

(१) अ) स्थावर मालमत्ता, त्या मालमत्तेचा परिमाण व नोंदणी इत्यादींचा तपशील कंपनीच्या पुस्तकात सापडत नाही. म्हणजे मालमत्तेची जागा/ठिकाण व त्याची जोड़णी वगैरेची नोंद नाही. त्या मालमत्तेची इतर स्थावर संपत्तीशी संबंध वगैरेची नोंद कंपनी पुस्तकात सापडत नाही. स्थावर मालमत्तेची किंमत ही स्थावर मालमत्ता दप्तर मध्ये नोंदलेल्या रकमांशी व ताळेबंद पत्रकात दाखवलेली स्थावर मालमत्ता किंमत यांच्याशी जुळत नाही.

ब) आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार दर ३ वर्षांनी कंपनी आपल्या स्थावर मालमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी करते. कंपनीचा व्याप व उद्योगाचे स्वरूप पाहता हे आमच्या मते योग्य आहे. आर्थिक वर्ष २००६-२००७ मध्ये कंपनीने अशी प्रत्यक्ष पडताळणी केल्याची नोंद आहे आणि ही नोंद स्थावर मालमत्ता दप्तर मध्ये असलेल्या नोंदीशी मिळती जुळती नाही.

क) आमच्या तपासणी अंतर्गत येणाऱ्या कालखंडात कंपनीने कुठलीही मोठी स्थावर मालमत्ता विक्री व्यवहार केलेली नाही.

२) अ) व्यवस्थापन त्यांच्या वस्तू, सामान, मालमत्ता इत्यादींची ठराविक व योग्य कालांतराने प्रत्यक्षपणे पडताळणी करते असे दिसते.

ब) आमच्या मते व आंम्हाला मिळालेल्या माहितीनुसार व खुलाशाप्रमाणे कंपनीच्या भांडाराची प्रत्यक्ष पडताळणी तपासणी ही व्यवस्थापनाकडून योग्य प्रकारे केली जाते. विशेषत: या कंपनीचा व्याप व उद्योगाचे स्वरूप पाहता ही पद्धत योग्य आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

क) भांडाराच्या साठ्यांच्या याद्यांची पाहणी आणि तपासणी संबंधीचे अहवाल तपासल्यानंतर आमचे असे मत आहे की कंपनी त्या सगळ्याची योग्य प्रकारे नोंद इत्यादी ठेवते आहे. त्यात कुठलीही तफावत (केवळ कोळसा वापर माहिती सोडून) आंम्हाला आढळली नाही. कोळसा वापरा संबंधी काही तफावत योग्य प्रकारे हिशेबात समायोजित केल्या आहेत. व्यवस्थापन प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबरला ही पडताळणी करते जी ताळेबंद पत्रक संपण्याच्या दिवशी होत नाही. त्यामुळे ताळेबंद पत्रकाच्या भांडाराची प्रत्यक्ष पडताळणी दिवशीची प्रत्यक्ष मालसूची व संग्रह नोंद वही यामध्ये काही तफावत असल्यास त्याबद्दल खात्रीलायकपणे सांगता येत नाही.

३) अ) आम्हांला मिळालेली माहिती व खुलासे याच्या आधारे १९५६ च्या कंपनी कायदा कलम ३०१ नुसार, या कंपनीने कुठल्याही व्यापारी संस्थेला कर्जाऊ रक्कम दिलेली नाही.

ब) त्याचप्रमाणे या कंपनीने इतर कंपनीकडून, संस्थेकडून किंवा इतरांकडून ज्याचे विवरण कंपनी कायदा १९५६, कलम ३०१ मध्ये दिले आहे, कुठल्याही प्रकारचा प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्ज, अग्रीम रक्कमा घेतल्या नाहीत.

४) आम्ही मिळवलेली माहिती व खुलासे यानुसार आणि या कंपनीचा व्याप्त व प्रकार इत्यादी लक्षात घेता कंपनी व्यवस्थापनाने (भांडारमाल इत्यादींची खरेदी किंवा स्थावर मिळकत, माल विक्री व सेवा देणे) याकरिता अंतर्गत नियंत्रण योग्य प्रकारे प्रस्थापित केले आहे.

याव्यतिरिक्त असे निदर्शनास आले की, चालु मत्ता व दायित्वाची जुळवणी आणि सभासदानुसार व काळानुसार यादी ठेवण्यात अंतर्गत नियंत्रण दुबळे दिसते.

५) आमच्या मते व मिळालेल्या माहितीनुसार, कंपनी कायदा १९५६ च्या कलम ३०१ च्या दफ्तरनुसार, जो व्यवहार कंपनीने नोंद केला पाहिजे, तसा कोणताही व्यवहार कंपनीने केलेला नाही.

६) कंपनी कायदा १९५६ च्या कलम ५८ (अ), ५८ (अअ) व कंपनी (स्वीकृत ठेवी) नियम १९७५ मध्ये दाखवलेल्या नियमानुसार या कंपनीने कुठलेही ठेवी जनतेकडून स्वीकारली नाही. आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार कंपनीविरोधात कोणतीही सुचना (ऑर्डर) कंपनीकायदा मंडळ, राष्ट्रीय आस्थापना कंपनी कायदा न्यायालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया किंवा अन्य कोणत्याही इतर न्यायालयाकडून जारी करण्यात आलेली नाही.

७) आमच्या मते व मिळालेल्या माहिती आणि खुलाशानुसार कंपनीमध्ये प्रचलित असलेली अंतर्गत हिशेब तपासणी पध्दत ही कंपनीच्या व्यवसायाच्या व्याप्त आणि स्वरूप यांच्या प्रमाणात अपुरी आहे आणि अत्यंत अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने चालू आहे, त्यामुळे त्यांच्या तपासणीची व्याप्तीही अपुरी दिसून आली. याशिवाय कंपनीने अंतर्गत हिशेब तपासणीसाठी बाहेरील व्यवसायिक सनदी लेखापाल संस्थेला नेमले असून अंतर्गत हिशेब तपासणी व्यवस्था मजबूत होण्याच्या अपेक्षा आहे.

८) कंपनीचे हिशेब तपासणी संबंधीची रजिस्टरे, बुके ही आम्ही पूर्णत: केंद्र सरकारच्या नियमानुसार तपासली आहेत. कंपनी कायदा १९५६, कलम २०९ (आई) (डी) यांचे अंतर्गत येणाऱ्या पद्धतीनुसार आम्ही त्यांची तपासणी करून त्यातील मूल्यासंबंधीच्या नोंदी माहिती करून घेतल्या आहेत. आमच्या मते सर्वसाधारणत: या सर्व नोंदी कायद्यानुसार योग्य अशाच आहेत. तथापि आम्ही या नोंदीचे विश्लेषण करून त्या तंतोतंत असल्याची खात्री केलेली नाही.

९) अ) आम्हांला मिळालेल्या माहितीच्या आधारे असे दिसते की, कंपनी सरकारी तिजोरीत भविष्य निर्वाह निधी, व गुंतवणूकदार शिक्षण कर, संरक्षण निधी, कर्मचारी राज्य विमा योजनेच्या रकमा, आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सेवाकर, जकात निधी, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क कर व इतर सरकारी रकमा योग्य वेळी, योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यांकडे/तिजोरीत जमा करीत असते.

आंम्हाला देण्यात आलेल्या माहिती व खुलाशानुसार, कंपनीच्या ताळेबंद संपल्याचा दिनांकापासुन कंपनीने कोणतेही अपवादग्रस्त आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सेवाकर, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क ६ महिन्या अधिक थकबाकी ठेवलेली नाही.

ब) कंपनीकडील नोंदीनुसार आयकर/विक्रीकर/सेवाकर/जकातकर संपत्तीकर/उत्पादन शुल्क इत्यांदीच्या भरण्याची थकबाकी ठेवलेली नाही शिवाय अशा कर भरण्याविषयी कुठल्याही देयक रकमा त्याबद्दलच्या वादाअंतर्गत थकलेल्या नाहीत, केवळ :

| **कर प्रकार** | **न भरलेली रक्कम (रु. लक्ष)** | **वाद कुठून चालू आहे** |
|---|---|---|
| उत्पादन शुल्क | १८६.६६ | केंद्रीय उत्पादन शुल्क आयोग |
| आयकर २००६-०७ | २५,८७५.०० | आयुक्त (अपील) |

१०) कंपनीच्या हिशेबात कुठलाही वाढत गेलेला तोटा (ॲक्युमलेटेड लॉस) या वर्ष अखेरीच्या हिशेबात आढळला नाही. कंपनीने कुठलाही रोख तोटा या वर्ष अखेरीला केलेला नाही किंवा येणाऱ्या आर्थिक वर्षाच्या काळासाठी असा तोटा दिसून आला नाही.

११) आमच्या हिशेब तपासणीनुसार आणि व्यवस्थापनाकडून आंम्हाला मिळालेल्या माहितीनुसार, आमचे असे मत आहे की कंपनीने कोणत्याही वित्तिय संस्था, बँक व ऋण पत्रधारकांच्या रक्कमा किंवा परतावा थकवलेल्या नाहीत.

१२) समभाग, ऋणपत्र इत्यादी प्रकार तारण ठेवून आमच्या माहितीप्रमाणे कंपनीने कुणालाही कर्ज, अग्रीम रक्कमा वगैरे दिलेल्या नाहीत.

१३) कंपनी कुठलाही चिट निधी - परस्पर लाभ निधी, संस्था इत्यादी प्रकारचे व्यवहार करणारी नाही. यास्तव आमच्या मते खंड (xiii) परिच्छेद ४ या उपरनिर्दिष्ठ आदेशातील तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

१४) तसेच आमच्या माहितीनुसार कंपनी कुठलाही समभाग विक्रीव्यवहार, प्रतिभूती पत्र, ऋणपत्र व इतर व्यवहार, कर्जरोखे खरेदी विक्री करीत नाही म्हणून खंड (xiv) परिच्छेद ४ या उपरनिर्दिष्ठ आदेशातील तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

१५) आमच्या माहितीप्रमाणे व मिळालेल्या खुलाशानुसार कंपनीने कोणत्याही, व्यक्ती, संस्था इत्यादींना कुठल्याही कर्ज व्यवहारात (बँका किंवा इतर अर्थव्यवहार संस्था) यांना जामीन / हमी दिलेली नाही.

१६) आमच्या माहितीप्रमाणे व मिळालेल्या खुलाशानुसार कंपनीने घेतलेली दिर्घकालीन कर्जे ज्या कामासाठी घेतलेली होती त्यासाठीच वापरण्यात आलेली आहेत.

१७) आमच्या माहितीप्रमाणे, मिळालेल्या खुलाशानुसार, व कंपनीच्या ताळेबंद तपासणी दरम्यान कुठलेही लघुकालीन कर्ज दीर्घकालीन प्रकल्पासाठी वापरण्यात आले नाही.

१८) या आर्थिक वर्षाच्या कालावधीत कंपनीने कुठलेही पसंतीचे भाग इतर संस्था किंवा कंपनीला जे कलम ३०१ च्या अंतर्गत आहे निवडक भाग म्हणून वाटप केलेले नाही.

१९) कंपनीने पूर्वकालीन म.रा.वि.मं. यांनी उभारलेल्या कर्जरोख्यासाठी सुरक्षा तारण दिलेले नाही. हे कर्जरोखे पुढील काळात (६ जून २००५) या कंपनीकडे हस्तांतरीत झाले आहेत तथापि हे व्यवहार कंपनी रजिस्ट्रार कडे नोंदलेले नाहीत.

२०) या हिशेब वर्ष कालावधीत सार्वजनिक भाग भांडवल विक्री मधून कंपनीने कुठलाही निधी उभारलेला नाही खंड (xx) परिच्छेद ४ नुसार वरील हुकूम कंपनीला लागू नाही.

२१) या आर्थिक वर्ष कालावधीत आमच्या द्वारे तपासलेल्या लेखा पुस्तके ही सर्वसाधारण स्वीकृत हिशेब सरावानुसार आहे. कंपनीत कसलाही गैरव्यवहार आंम्हाला आढळला नाही आणि असेल तर अशा गैरव्यवहाराबाबत आम्हांला कळविले गेले नाही.

**मेसर्स फोर्ड, ऱ्होडस्, पार्कस्**
**आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरिक्षक
सही /-

**एस.बी.प्रभू**
भागीदार
एम् क्रं. ३५२९६
सं. क्रं.

**मेसर्स पी. जी. भागवत**
**कंपनीकरिता**
सनदी लेखापरिक्षक
सही /-

**एस.एस. आठवले**
भागीदार
एम् क्रं. ८३३७४
सं. क्रं

**मेसर्स पी.जी. जोशी**
**आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरिक्षक
सही /-

**सुधीर पी. तिडके**
भागीदार
एम् क्रं. ०३९३६२
सं. क्रं.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २५ नोव्हें, २००९

# सूचना

या पत्रकाद्वारे जाहिर सूचना देण्यात येत आहे की महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित या संस्थेच्या भागधारकांची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा २५ नोव्हेंबर २००९ या दिवशी दुपारी ४ वाजता हाँगकाँग बँक इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०५१ या ठिकाणी आयोजित केलेली असून त्यात खालील विषयांवर चर्चा होईल.

**सर्वसाधारण विषय**

१) कंपनीचे परिक्षित ताळेबंद ३१/०३/०९ पर्यंतच्या बाबींचे सादरीकरण व त्यावर चर्चा करून ते स्वीकृत होणे तसेच नफा-तोटा परिपत्रक, याच वर्षी कामासाठी आणि संचालकांचा अहवाल व त्यावरील लेखा परिक्षकांचा अहवाल सादर करणे. *

२) खालील ठराव विचारार्थ मांडला जाऊन तो योग्य वाटल्यास ह्यात काही बदल न करता सर्वसाधारण ठराव म्हणून पारित करणे,

ठराव करण्यात येत आहे की, आस्थापनाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० साठी कंपनी कायदा १९५६ च्या कलम २२४ (८) (अअ) जे कलम ६१९ (२) सहित वाचायचे आहेत व इतर कंपनी कायदा १९५६ च्या लागू तरतुदीनुसार कंपनी या ठरावाद्वारे रु. १६ लाख ५० हजार इतकी रक्कम पारिश्रमिक (रेम्युनरेशन) म्हणून आपल्या सांविधिक हिशेब तपासकांना प्रदान करील आणि हे प्रदान प्रचलित लागू सेवाकराचे आधीन राहून केले जाईल. याशिवाय या हिशेब तपासनीसांना त्यांच्या वरकड खर्चाप्रीत्यर्थ अतिरिक्त प्रतिपूर्ती रू. २ लाख मर्यादेपर्यंत केली जाईल.

या व्यतिरिक्त आणखी असाही ठराव पारित करण्यात येतो आहे की कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक या ठरावाद्वारे सर्व कामकाज/कार्यवाही व आवश्यक ते सर्व नियम अंमलात आणण्यासाठी सर्वाधिकार ग्रहण करतील.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**खास विषय**

योग्य वाटल्यास खालील ठराव विचारात घेऊन ते मंजूर करावेत.

**सर्वसाधारण ठराव**

३) असा ठराव करण्यात येतो की, श्री. प्रकाश व्ही. पागे यांची १ डिसेंबर २००८ पासून कंपनी अनुच्छेदनुसार मंडळाने कंपनी कायदा १९५६ च्या कलम २६०, संस्थापन नियमावली ८२ च्या तरतुदीनुसार सहाय्यक संचालक म्हणून नियुक्ती केली होती व त्यांचा कार्यालयीन कार्यभार या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी संपत होता. त्यांना कंपनीचे संचालक म्हणून नियुक्त केले जात आहे.

४) असा ठराव करण्यात येतो की, सदस्यांची अनुमति आणि कंपनी कायदा १९५६ च्या कलम २९३ (१) (डी) मधील तरतुदीनुसार कंपनीच्या संचालक मंडळाला कंपनीच्या व्यवहारांसाठी काही रक्कम उचलण्याची परवानगी देण्यात आली आहे. (नेहमीच्या व्यवहारासाठी बँकेकडून कंपनीने घेतलेल्या तात्पुरत्या कर्जा व्यतिरिक्त) उरलेली उचल एका

विशिष्ट वेळी घेताना त्यांना अशी खबरदारी घ्यायला हवी की एकूण रक्कम, देय भाग भांडवल व त्यावरील मुक्त ठेव, मिळून त्याहून अधिक नसावी, म्हणजेच कोणत्याही विशिष्ट कामासाठी ठेव बाजूला राखली नसेल तर संचालक मंडळाने कर्जाऊ घेतलेली रक्कम जी कोणत्याही वेळी २५,००० कोटी रू. पेक्षा अधिक असू नये

असाही ठराव करण्यात येतो की, कंपनीच्या वतीने, कागदपत्रे, करारनामे, लेखी करार, जाहिरनामे, हमीपत्रे तयार करणे त्यावर अंतिम निर्णय घेणे, ती संमत करणे व त्याची ठरावातील गोष्टींची अंमलबजावणी करण्याचे अधिकार संचालक मंडळाला असतील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

राहुल दुबे

**कंपनी सचिव**

स्थळ: मुंबई
दिनांक: २५ नोव्हें, २००९

*११ मे २०१० च्या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल स्विकारण्यात आला.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## टीपा

१) कंपनी कायदा १९५६, कलम १७६ (२) नुसार खुलासा निवेदन बाब क्र. ३ व ४ संबंधी सोबत जोडली आहे आणि म्हणून तो या सूचनेचा अंतर्गत भाग ठरतो.

२) मतदानाचा हक्क असलेला सभासद हा (फक्त) मतदानासाठी आपला प्रतिपत्री (प्रॉक्सी) नेमू शकतो. असा प्रतिपत्री सभेला हजर राहून मतदानात सहभाग घेऊ शकतो. पण तो केवळ मतदान करु शकेल असा प्रतिपत्री कधीही सभासद ठरत नाही.

३) १९५६ च्या कंपनी कायद्यानुसार सरकारी मालकीची कंपनी आपले सांविधिक हिशेब तपासनीस हे भारताचे नियंत्रक व महालेखाकार मार्फतच केवळ नेमू शकेल. अनुच्छेद ६१९/(२) आणि सांविधिक हिशेब तपासनीस मंडळाचे परिश्रमिक हे प्रत्येक कंपनीच्या सर्वसाधारण सभेत कंपनी सभासदांकडून मंजूर केले जाईल.

वरील कार्यक्रमाचे अंतर्गत आणि कंपनी कायदा १९५६ च्या कलम ६१९(२) नुसार या सभासदांना विनंती करण्यात येते की हिशेब तपासनीसांचे परिश्रमिक रू. १६ लाख ५० हजार वजा लागू सेवा कर असे कंपनीच्या १ एप्रिल २००९ पासून ३१ मार्च २०१० पर्यंतच्या आर्थिक वर्षासाठी देण्याचे मान्य करावे. याशिवाय वर उल्लेख केलेल्या परिश्रमिक हे हिशेब तपासनीसांच्या वरकड खर्चाची भरपाई करण्यासाठी रू. २ लाख मर्यादेपर्यंत देण्यात येईल. सर्वसाधारण ठरावात म्हणटल्यानुसार या रकमा मंजूर कराव्यात.

४) या सूचना परिपत्रकात उल्लेख झालेल्या बाबीसंबंधीची सर्व कागदपत्रे, पुस्तके, दफ्तरे तपासणीसाठी सभासदांना या सभेच्या कार्यकालापर्यंत कंपनीच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध राहतील.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## कंपनी कायदा १९५६ चे कलम १७३(२) याला अनुसरून खुलासा निवेदन

बाब ३

श्री. प्रकाश व्ही. पागे यांना दिनांक १ डिसेंबर २००८ पासून अतिरिक्त संचालक म्हणून मंडळाने नियुक्त केले. कंपनी कायदा १९५६, कलम २६० मधील तरतुदीनुसार संचालक मंडळाने अतिरिक्त संचालक म्हणून नेमलेले हे नेहमी येणाऱ्या दुसऱ्या सर्वसाधारण वार्षिक सभेपर्यंतच कार्यरत राहू शकतात व त्यांची नियुक्ती ही भागधारक सभासदांकडून मंजूर होणे आवश्यक असते. त्यानंतर तो नियमित संचालक म्हणून कार्यभार घेऊ शकतो. यास्तव श्री. प्रकाश व्ही. पागे यांची संचालक म्हणून नियुक्ती या वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता देऊन नियमित करावी यासाठी हा ठराव सभेसमोर मांडला आहे.

संचालक मंडळाने हा ठराव मंजूर व्हावा ही अशी शिफारस केलेली आहे. स्वत: श्री. प्रकाश व्ही. पागे हे सोडून इतर कुठल्याही संचालकाने हा ठराव मंजूर करून घेण्यास हितसंबंध इत्यादी नाहीत.

बाब ४

कंपनीला भांडवल देणी व मुक्त ठेवींमुळे पडलेल्या अतिरिक्त भारासाठी कर्ज घेण्याचा सभासदांच्या संमतीचा सर्वसाधारण ठराव मंजूर करणे गरजेचे आहे. सध्या स्थितीत भांडवल देय आणि मुक्त ठेव रू. २९५९.३८ कोटी इतक्या असून २३/९/०५ च्या बैठकीत भागधारकांनी कंपनीस कर्ज घेण्याची मर्यादा रू. ११५०० कोटी इतकी ठेवली होती जी कंपनीच्या संचालक मंडळांनी घेतलेल्या नवीन प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जांच्या रकमेमुळे अधिक झाली आहे. यामुळेच कंपनीच्या संचालक मंडळाला रूपये २५,००० कोटी कर्ज घेण्याचे अधिकार देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
राहुल दुबे

**कंपनी सचिव**

स्थळ: मुंबई
दिनांक: २५ नोव्हें, २००९

# संचालक मंडळाचा अहवाल

माननीय सभासद

आपल्या कंपनीचा चौथा वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २००९ या वर्ष अखेरीचे परिक्षित लेखा विवरण आपल्या समोर सादर करताना आनंद होत आहे.

## वित्तीय परिणाम

(रु. लाखांमध्ये)

| | २००८-०९ (रु.) | २००७-०८ (रु.) |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्रीतून आलेला महसूल (निव्वळ) | ९३४६४९.३६ | ८०८१९७.२२ |
| इतर उत्पन्न | १३२६३.८६ | १६६७७.४३ |
| **एकूण उत्पन्न** | **९४७९१३.२२** | **८२४८७४.६५** |
| **खर्च** | | |
| इंधन किंमत | ७१५६२४.९९ | ५९९८१०.३२ |
| निर्मिती, प्रशासन व इतर खर्च | ८७४९३.३९ | ८४९२८.०४ |
| कर्मचारी खर्च | ६३०१२.१० | ४७४८६.९१ |
| घसारा/अमूर्तकरण | ३०७५३.२९ | २०६५४.८५ |
| व्याज आणि वित्तिय भार | ४४८३५.२५ | १२०६०.०७ |
| **करभरणा करण्यापूर्वी निव्वळ नफा तसेच तरतूद व कालमानानुसार समायोजन** | **६१९४.२०** | **५९९३४.४६** |
| **कर** | **(११३४.०६)** | **२२१९६.६६** |
| कर भरल्यानंतर नफा परंतु कालमानानुसार समायोजनापूर्वी | ७३२८.२६ | ३७७३७.८० |
| **वजा - कालपूर्व तरतूद** | १०८१.२५ | ७७३४.७७ |
| कर भरणा केल्यानंतर उरलेला निव्वळ नफा | **८४०९.५१** | **३०००३.०३** |

## वित्तिय कार्य

कंपनीचे एकूण उत्पन्न या आर्थिक वर्षात १४.९१% नी वाढले असून ते या वर्षी ८२४८७४.६५ लाख रुपये पासून ९४७९१३.२२ लाख एवढे झाले आहे. गेल्या वर्षी ते रु. ८२४८७४.६५ लाख होते. कालपूर्व तरतुदीपूर्वी कर भरल्यानंतर

झालेला नफा रु. ७३२८.२६ लाख इतका झाला असून गतवर्षी तो ३७७३७.८० इतका होता. यावर्षी इंधनाची किंमत १९.३१% वाढली असून गेल्या वर्षी ती १०.१७% होती. निर्मिती व प्रशासन खर्च ३% ने वाढला असून गेल्यावर्षी तो २५% होता आणि कर्मचारी खर्च गेल्या वर्षीच्या तुलनेत ३२.६९% ने वाढला आहे. कर भरल्यानंतरचा निव्वळ नफा रु. ८४०९.५ लाख झाला असून गेल्या वर्षी तो रु. ३०००३.०३ लाख होता म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत ७२% ने घसरण झाली आहे.




महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित



## लाभांश

भविष्य काळात कंपनीला जी प्रचंड प्रमाणात क्षमता विस्तारीत करणे गरजेचे आहे त्यासाठी विविध योजना विचाराधीन असून त्यासाठी फार मोठा निधी उभारणे अत्यंत गरजेचे आहे. आज या महाराष्ट्रात आपण अनुभवित असलेला तीव्र वीज पुरवठा तुटवडा भरुन काढण्यासाठी या सर्व योजना तातडीने कार्यान्वयित करायला हव्यात. याच कारणास्तव आपल्या संचालक मंडळीने आज उभारलेला जास्तीचा निधी या प्रस्तावित योजनांसाठीच कंपनी व्यवहारात पुन्हा परत करायचे ठरवले आहे. त्यामुळे या वर्षी सभासंदासाठी या आर्थिक वर्षासाठी लाभांश म्हणून काही जाहीर केलेला नाही.

म.रा.वि.नि.कं.म. ची एकूण प्रतिस्थापित क्षमता १०१२१ मेगावॅट आहे आणि ३१ मार्च २००९ ला कमी केलेली क्षमता (डीरेटेड) ९९९६ मेगावॅट झाली आहे.

वर्ष २००८-०९ या काळात कंपनीने केलेली वीज निर्मिती ५०३९८ दशलक्ष संच आहे. २००७-०८ साली ती ५२२९४ दशलक्ष संच होती. यापैकी औष्णिक वीज निर्मिती ४२०६० दशलक्ष संच होती. जी मागील वर्षी ४३९५८ द. यु. होती. गॅस आधारित वीज निर्मिती केंद्रातून यावर्षी ४४३१ द.यु. वीजनिर्मिती झाली जी गेल्यावर्षी ३७२९ द.यु. होती. जलविद्युत प्रकल्पातून यावर्षी ३९०५ द.यु. वीजनिर्मिती झाली जी गेल्यावर्षी ४६०६ द.यु. होती.

२००८-२००९ या वर्षकाळात कोळसा वापर वीजनिर्मिती केंद्रातील सरासरी उपलब्धता गुणक हा ८६.६९% (८७.५८%) होता. संच भार गुणक ७०.६१% (७६.९९%) २००८-०९ मध्ये २४ संचाचे दुरुस्ती काम करण्यात आले ते गेल्यावर्षी २६ संचाचे करण्यात आले होते नियोजित उत्प्रवाह आणि बळजोरी उत्प्रवाह गुणक हे यावर्षासाठी ८.४१% व ४.९०% होते जे २००७-०८ साली ७.९५% व ४.४७% इतके होते. म.रा.वि.नि.कं.म. चे उपलब्धता गुणक व संच भारगुणक (नवीन परळी व पारस संचचे २५० मेगावॅट वगळता) प्रत्येकी ८८.४३% व ७२.४४% होते तर नियोजित उत्प्रवाह आणि बळजोरी उत्प्रवाह ४.४१% व ४.९०% होता. गॅसवर चालणाऱ्या केंद्राची सरासरी उपलब्धता ९%, ७१%, (९७.०२%) आणि संयम भार गुणक (प्लन्ट लोड फॅक्टर) ५९.३८%, (४९.८४%) यावर्षी एकूण निर्मिती २५० मेगावॅट परळी येथे आणि पारस २०८० द.यु. एवढी होती.

यावर्षीची कोळसा इंधनातून वसुली ८८.११% इतकी असून गतवर्षी ती ९१.०८% होती. कोळसा वापराचा निश्चित दर०.८२८ कि./किलोवॅट इतका असून गतवर्षी तो ०.७९६ इतका होता. यावर्षी बाष्पपात्र नळ गळतीची टक्केवारी २.३८% इतकी असून गतवर्षी ती २.९४% इतकी होती.

निश्चित तेल वापराचा दर यावर्षीसाठी ४.१२ मिली/किलोवॅट इतका असून गेल्यावर्षी तो ८.७८% इतका होत. यावर्षी कोळसा वापरातून एकूण सरासरी उष्णता दर ३४५५ किलो कॅलरी / किलोवॅट इतके आहे. यावर्षीचा उष्णता दर २८९८ किलोकॅलरी/किलोवॅट इतके होते. यावर्षीचा संक्रमण ०.९६% इतकी असून गतवर्षी ती ०.४३% इतकी होती.




| वर्ष | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
|---|---|---|---|
| भाग-१ | ८२.११ | ८७.५८ | ८६.६९ |
| भाग-२ | ७३.६४ | ७६.६९ | ७०.६१ |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वीज केन्द्राच्या कृतीचे वर्ष २००७-०८ व २००८-०९ चे विश्लेषण

| अ. क्र. | विशेष | २००७-०८ | २००८-०९ | कारणे |
|---|---|---|---|---|
| १. | निर्मिती (द.यु.) | | | |
| | औष्णिक | ४३९५८.२७६ | ४२०६०.५५३ | २००८-०९ मध्ये कोळसा कमतरतेमुळे ११२९ द. यु. तोटा, ओल्या कोळशामुळे १२२६ द. यु. तोटा<br>२००७-०८ मध्ये कोळसा कमतरता नव्हती<br>२००८-०९ मध्ये चंद्रपूर येथे सीएसपी स्ट्रीम अडथळा, व्हीयब्रेशन अडथळा, पारस येथे राख निचऱ्यामुळे अडथळा व कोरडी संच-४ येथे रोटर अर्थफॉल्ट रेक्टिफिकेशन कामामुळे प्रदीर्घ उत्प्रवाह. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वायु | ३७२९.९७४ | ४४३१.७८७ | २००८-०९ मध्ये अधिकचा आरएलएनजी गॅस आणला गेला (१२८.३३ एम.एम. एम.सी.एम.) |
| | जलविद्युत | ४६०६.२०७ | ३९०५.८५१ | २००७-०८ पूर आवाक्यात आणताना पाण्याचा अधिक पुरवठा झाल्याने निर्मिती अधिक झाली. |
| | **एकूण** | **५२२९४.४५७** | **५०३९८.१९१** | |
| २. | संच भार गुणक (%) औष्णिक | ७६.९९ | ७०.६१ | अनुक्रमांक १ मध्ये उल्लेखिलेल्या कारणांमुळे कमी वीज निर्मितीमुळे संच भार गुणक कमी |
| ३. | उपलब्धता गुणक (%) औष्णिक | ८७.५८ | ८६.६९ | उपलब्धता गुणक कमी कारण अधिक नियोजित उत्प्रवाह व बळजोरी उत्प्रवाह ०७-०८ नियोजित उत्प्रवाह ७.९५% ०८-०९ ८.४१% बळजोरी उत्प्रवाह २००७-०८ ४.४८%, २००८-०९ ४.९०% |
| ४. | निश्चित तेल वापर मिली/किलोवॅट | १.७८ | ४.१२ | जुलै ०८ मध्ये विदर्भ व खाणीच्या भागात जोरदार पाऊस झाल्याने ओल्या कोळशासाठी अधिक तेलाचा वापर करावा लागला आणि भाराच्या दडपणामुळे संचामध्ये अपूर्ण भार |
| ५ | निश्चित कोळसा प्रति किलो /किलोवॅट | ०.८० | ०.८३ | किंचित वाढ |
| ६ | सहाय्यक वापर | ८.७८ | ९.४९ | कमी निर्मिती व संचमध्ये अपूर्ण भार यामुळे सहाय्यक वापरात वाढ |

## पुरवठा आकलनशक्ति

कंपनीकडे ७ वेगवेगळ्या ठिकाणी औष्णिक वीज उत्पादन केंद्रे आहेत. शिवाय एक केंद्र गॅस वीज चक्कीवर चालणारे आहेत आणि २४ जलविद्युत केंद्रे कार्यरत आहेत. त्या सर्वांची एकूण वीज निर्मिती क्षमता ही ३१/३/२००९ च्या आकडेवारीनुसार खालीलप्रमाणे आहे.

| **प्रकार** | **क्षमता** |
|---|---|
| औष्णिक | ६८०० मेगावॅट |
| वायु | ८५२ मेगावॅट |
| जलविद्युत | २३४४ मेगावॅट |
| एकूण | ९९९६ मेगावॅट |

## आकलनशक्ति वितरण




## क्षमता वाढवणारे कार्यक्रम

महाराष्ट्र राज्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासाठी आपली कंपनी अनेक औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प सुरु करीत आहे.

### अ) चालू प्रकल्प (क्षमता वाढ ४७७० मेगावॅट) यावर्षात खालील दोन प्रकल्प सुरू करण्यात आले.

**१) परळी औ.वि.कें. संच ७ (२५० मेगावॅट) या प्रकल्पांसाठी सयंत्रे व साधने यांच्या मागणी (ऑर्डर्स) ३१/८/०६ रोजी मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या आहेत. २००८-०९ या वर्षात खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.**

| अ.नु. | महत्वपूर्ण कामगिरी | पूर्ण झाल्याची दिनांक |
|---|---|---|
| १) | बाष्पपात्र पिंप उचलणी | १५/०४/०८ |
| २) | कन्डेसर उभारणीची सुरुवात | १५/०७/०८ |
| ३) | टीजी उभारणीची सुरुवात | २५/०९/०८ |
| ४) | स्टेटर उचलणी | ०१/११/०८ |
| ५) | जल चाचणी - वाहणारी | १७/१२/०८ |
| ६) | जल चाचणी -न वाहणारी | ०४/०७/०९ |
| ७) | बाष्पपात्र ज्वलन | १२/०७/०९ |

| | | |
|---|---|---|
| ८) | तेल फवारणीची सुरुवात | ०६/०८/०९ |
| ९) | अल्कली बाष्पीकरण व ॲसिड स्वच्छीकरण | १३/०८/०९ |
| १०) | पूर्ण जनित्रे ठोसीकरण | १७/०८/०९ |
| ११) | बाष्प फुंकणे | १९/१०/०९ |

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. नियोजित चाचणी ३१/१२/०९ ला अपेक्षित आहे.

## २) पारस औ.वि.कें. संच ४ (२५० मेगावॅट)

या प्रकल्पांसाठी लागणाऱ्या संयंत्र व साधनांच्या मागणी (ऑर्डर्स) ३१/०८/०६ ला मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या आहेत. २००८-०९ या वर्षात खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.

| अ.नु. | महत्वपूर्ण कामगिरी | पूर्ण झाल्याची दिनांक |
|---|---|---|
| १) | बाष्पपात्र पिंप उचलणी | १५/०५/०८ |
| २) | कन्डेसर उभारणीची सुरुवात | १८/०८/०८ |
| ३) | टीजी उभारणीची सुरुवात | २२/०९/०८ |
| ४) | स्टेटर उचलणी | २१/११/०८ |
| ५) | हायड्रॉलिक चाचणी - ड्रेनेबल | १८/०२/०८ |
| ६) | हायड्रॉलिक चाचणी - नॉन ड्रेनेबल | ०२/०७/०९ |
| ७) | बॉयलर लाईट अप | ०३/०७/०९ |
| ८) | ऑईल फलशिंगची सुरुवात | २२/०७/०९ |
| ९) | अल्कली बॉईल आऊट आणि ॲसिड क्लिनिंग | २३/०७/०९ |
| १०) | बॉक्सिंग अप ऑल जनरेटर | ३०/०८/०९ |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. नियोजित चाचणी ३०/०१/२०१० ला अपेक्षित आहे.

## ३) खापरखेडा औ.वि.कें. संच ५ (५०० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणाऱ्या सयंत्र व साधनांच्या मागणी (ऑर्डर्स) २३/०१/०७ (शून्य दिनांक) ला मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या आहेत. उर्वरित संयंत्राच्या मागणी दिनांक ३/०७/०७ रोजी मेसर्स बीजीआर एनर्जी सिस्टिम लि. यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या आहेत.

२००८-०९ या वर्षात खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.

| अ.नु. | महत्वपूर्ण कामगिरी | पूर्ण झाल्याची दिनांक |
|---|---|---|
| १) | बॉयलर ड्रम उचलणी | २८/११/०८ |
| २) | कन्डेसर उभारणीची सुरुवात | २८/०३/०९ |
| ३) | टीजी उभारणीची सुरुवात | १५/०४/०९ |
| ४) | स्टेटर उचलणी | २४/१०/०९ |

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. नियोजित चाचणी जुलै २०१० मध्ये घेण्यात येणार आहे.

**४) भुसावळ औ.वि.कें. संच ४ व ५ (२×५०० मेगावॅट)**

या प्रकल्पासाठी लागणाऱ्या सयंत्र आणि साधनांच्या मागणी (ऑर्डर्स) २३/०१/०७ (शुन्य दिनांक) रोजी मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या आहेत. उर्वरित संयंत्रांच्या मागणी दिनांक ५/११/०७ ला मेसर्स टाटा प्रकल्प म. यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या आहेत.

२००८-०९ या वर्षात खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.

| अ.नु. | महत्वपूर्ण कामगिरी | पूर्ण झाल्याची दिनांक |
|---|---|---|
| १) | बॉयलर उभारणीची सुरुवात | ०३/०८/०८ (संच ५) |
| २) | बॉयलर ड्रम उचलणी | ०९/०१/०९ (संच ४) |
| ३) | कन्डेसर उभारणीची सुरुवात | १४/०३/०९ (संच ४) |
| ४) | बॉयलर ड्रम उचलणी | २०/०४/०९ (संच ५) |
| ५) | टीएफ उभारणीची सुरुवात | ३०/०४/०९ (संच ४) |

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. संच ४ ची नियोजित चाचणी आक्टोबर २०१० मध्ये घेण्यात येणार असून त्यापाठोपाठ २०११ मध्ये संच ५ ची चाचणी घेण्यात येणार आहे.

सरकारी ठराव क्रं. व्ही. नी. के./प्र.क्र. २०४४/ऊर्जा - ४ दि. १२/०५/०६ नुसार महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.

**५. चंद्रपूर औ.वि.कें. संच ८ व ९ (२ × ५०० मेगावॅट)**

यावर्षी प्रकल्पासाठी लागणाऱ्या सयंत्र व साधनांच्या मागणी (ऑर्डर्स) २५/०७/०८ ला (शून्य दिनांक ०९/०२/२००९) मेसर्स भेल यांना देण्यात आल्या. उर्वरित सयंत्र सामुग्रीची मागणी जून ०९ मध्ये मेसर्स बीजीआर एनर्जी सिस्टम लि. यांना देण्यात आली.

संच ८ ची चाचणी जुलै २०१२ मध्ये घेण्यात येणार असून संच ९ ची चाचणी ऑक्टोबर २०१२ मध्ये होणार आहे.

सरकारी ठराव क्रं. प्रकल्प - २००७/ प्र. क्रं. ११०६ /ऊर्जा - ४ दिनांक ५/०३/०८ नुसार महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे.

६. **परळी औ.वि.कें. संच ८ (१×२५० मेगावॅट चालू २×२० मेगावॅट कमी झालेली क्षमता संचच्या बदल्यात - एकूण क्षमतावाढ २१० मेगावॅट)**

यावर्षी प्रकल्पासाठी लागणाऱ्या सयंत्र व साधनाची (ऑर्डर) मागणी दिनांक २०/०१/०९ (शून्य दिनांक) ला मेसर्स भेल यांच्याकडे देण्यात आली आहे आणि नैसर्गिक थंड कळस नमुना वगळता सुधारित गुणवत्ता मागणीनुसार उर्वरित सयंत्राना ३१/८/०९ एनआयटी देण्यात आली. नॅचरल ड्राफ्ट कुलिंग टॉवरला देखील ०९/०९/०९ रोजी एनआयटी देण्यात आली. नियोजित चाचणी जानेवारी २०१२ मध्ये घेण्यात येणार आहे.

पत्र क्र. प्रकल्प २००८/प्र.क्र. १४५१/अर्जा ४ दिनांक २९-०१-०९ नुसार महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प मंजूर केला आहे.

म्हणजेच, महानिर्मितीने आर्थिक वर्ष २००९ मध्ये ५०० मेगावॅट आर्थिक वर्ष २०१० मध्ये १५०० मेगावॅट आणि आर्थिक वर्ष २०१२ मध्ये १२०१ मेगावॅट इतकी क्षमता वाढवणार आहे.

७. **कोराडी औ.वि.कें. संच ८,९,१० (३×६६० मेगावॅट - संच ८ चालू २×१०५ मेगावॅट कमी झालेल्या क्षमता संचच्या बदल्यात एकूण क्षमतावाढ १५६० मेगावॅट)**

दिनांक २३/०९/२००९ ला मेसर्स एल् ॲन टी कडे बाष्पपात्र आणि पवनचलित जनित्र गठ्ठयांची मागणी सोपवण्यात आली. प्रकल्पाचे काम सुरु आहे. संच ८ ची नियोजित चाचणी २३/१२/२०१३ ला घेण्यात येणार असून संच ९ ची २३/६/२०१४ व संच १० ची २३/१२/२०१४ ला घेण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने ठराव क्रं. प्रकल्प २००८/प्र.क्र./११८९/उर्जा ४ दिनांक १४/१०/०८ द्वारे प्रकल्पाला मंजूरी दिली आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ब) भविष्य कालीन प्रकल्प प्रस्ताव (क्षमता वाढ ४९६५ मेगावॅट)

१) **भुसावळ औ.वि.कें. संच ६ (१×६६० मेगावॅट - चालू १×५५ मेगावॅटच्या बदल्यात - एकूण क्षमता वाढ ६०५ मेगावॅट)** पारस येथील जमिनधारकांच्या निषेधाचा योग्य तो मान राखून पारस येथे १×२५० मेगावॅट क्षमतेचे बदली संच स्थापित करण्याचा प्रस्ताव करण्यात आला. तरीही या प्रकल्पाला लागणाऱ्या साधन सामुग्रीची जुळवाजुळव पुर्ण झालेली असल्यामुळे ती भुसावळ औ.वि.कें. येथे हलवण्यात आली, जिथे जमिन धारणेची प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झाली आहे. ही जमिन वरील प्रकल्प उभारण्यासाठी पुरेशी आहे. आता २×२५० मेगावॅटच्या बदल्यात ६६० मेगावॅट चे एक संच उभारण्याचा प्रस्ताव आहे.

२) **दोन्डाईचा औ.वि.कें. संच १ आणि २ (२×६६० मेगावॅट)** जमीन धारणेची प्राथमिक प्रक्रिया सुरु आहे. योजनेनुसार सयंत्राची मागणी ऑक्टोबर २०१० पर्यंत अपेक्षित आहे. यानुसार संच १ ची चाचणी प्रक्रिया

जानेवारी २०१५ व संच २ ची जमीन शोधण्यात आली असून सरकारने मंजूर केलेल्या दराने ती देण्यास स्थानिक लोकांनी मान्यता दिली आहे. प्रकल्पापासून २० किमी अंतरावर असलेल्या निम्न तापी प्रकल्पामार्गे सारंगखेडा धरणातून पाणी पुरवठा उपलब्ध होणार आहे. भारत सरकारने धुळे व नाशिक जिल्ह्यातील २५०० मेगावॅटच्या वीज प्रकल्पासाठी ओरीसातील चेंदीपाडा कोल ब्लॉक कडून कोळसा पुरवठा मंजूर केला आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगडच्या संयुक्त विद्यमाने पूर्ण होणार आहे. एकूण १५८८.९९ एमएमटी पैकी म.रा.वि.नि.कं.म. चा वाटा २९४.५ एमएमटी असून जो ३० वर्षापर्यंतच्या २×६६० मेगावॅट साठी पुरेसा आहे.

३) **दोन्डाईचा औ.वि.कें. संच ३,४ आणि ५ (३×६६० मेगावॅट)** म.रा.वि.नि.कं.म. आणि जी.एस्.ई.सी. एल्. च्या भावी प्रकल्पांच्या आवश्यकतेनुसार मच्छाकाटा कोल ब्लॉकची क्षमता सुरुवातीस ३० एम्.टी./ प्रतिवर्ष एवढी मोजण्यात आली होती. तथापि कोळसा मंत्रालयाने मच्छाकाटा व महानदी या खाणींना एकत्रित विकास करण्याच्या सूचना दिल्या त्यामुळे उपलब्ध साठा अंदाजित मोजणीपेक्षा जास्त भरला. त्यामुळे कोळसा मंत्रालयाने खाण ५० एम्.पी.टी.ए.च्या क्षमतेनी गणली जावी. अशी शिफारस केली. कोळशाच्या या अधिक उपलब्धीमुळे म.रा.वि.नि.कं.म. ने दोन्डाईचा औ.वि.कें. मध्ये ३,४,५ संच अशा प्रत्येकी ६६० मेगावॅटची संच स्थापण्याची योजना केली. या योजनेनुसार मुख्य सयंत्राची (प्लान्टची) ऑर्डर जुलै २०१५, त्यापाठोपाठ संच ४ ची जानेवारी २०१६ आणि संच ५ ची जुलै २०१६ मध्ये नियोजित आहे.

४) **उरण वा. औ.वि.कें. संच ९ व १० (१२२० मेगावॅट)**

वाजवी किंमतीत वायु पुरवठा केल्याबद्दलचे प्रशस्ती पत्र मे २०१० मध्ये अपेक्षित आहे. संच ९ (८१४ मेवॅ) ची चाचणी ऑगस्ट २०१२ मध्ये तर संच १० (४०६ मेवॅ) नोव्हें. २०१२ मध्ये अपेक्षित आहे. संच १० (४०६ मेवॅ) नोव्हें २०१२ मध्ये अपेक्षित आहे. वायु उपलब्ध करून देण्यासाठी शोधकार्य सुरु आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रं. व्ही.नी.प्र. २००५/प्र.क्र.१९६७/ऊर्जा ७ दिनांक १-६-२००५ च्या आदेशानुसार १०४० मेगावॅट क्षमतेच्या स्थापिताचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. १२२० मेगावॅट क्षमतेच्या मंजुरीसाठी बोलणी सुरु आहेत.

## दुय्यम व संयुक्त उपक्रम:

**महागुज कॉलीअरीज लि.**: ही संस्था आपली कंपनी आणि गुजरात राज्य वीज कंपनी मर्यादित यांच्यातील मच्छकाटा येथील कोळसा खाणीतील कोळसा काढण्याची संयुक्त प्रक्रिया आहे हा प्रकल्प राबविण्यासाठी कंपनीने खाण विकास अधिकारी व चालक नियुक्त केले आहेत. काही आवश्यक प्राथमिक कामे, जसे जागा मिळविणे, विविध सरकारी परवाने मिळविणे चालू झाले आहे. चालू वर्षात महागुज कॉलिअरिज आणि एमडीओ यामध्ये कोळसा पुरवठा करार तसेच महागुज कॉलिअरीज आणि संयुक्त उपक्रम भागीदार म्हणजेच महाजेनको आणि गुजरात राज्य वीज कंपनी मर्यादित यांच्यात इंधन पुरवठा करार होण्याची शक्यता आहे. कोळसा मंत्रालयाने या प्रकल्पातील नापसंत (रिजेक्टेड) केलेला कोळसा प्रशिक्षित बाहेरील संस्थान (एमडीओसकट) विद्युत निर्मितीसाठी खड्डयाच्या मुखाशी वापरण्यास परवानगी दिली आहे. अशा प्रकारे निर्मिती झालेली वीज मेसर्स महाजेनको आणि जीएसइसीएल ()द्वारे वापरण्यात येईल म्हणून न वापरलेला कोळसा वापरुन वीज निर्मिती करण्याचे विद्युतगृह खड्डयाच्या मुखाशी बांधायचे ठरविले आहे. या प्रकल्पांचा कच्चा आराखडा तयार करण्यात आला आहे. मच्छकाटा येथील कोळसा खाणीची क्षमता लक्षात घेता कोळसा मंत्रालयाने खाणीची

क्षमता ३० एमटीपीए वरुन ५० एमटीपीए एवढी वाढवण्याचे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे महागुज कॉलरिजच्या व्यवस्थापनाने खाणीची क्षमता ३० एमटीपीए वरून ५० एमटीपीए वाढवण्याचे मान्य केले आहे. महाजेनको हा अतिरिक्त कोळसा दोडांइचा औ.वि.कें. २×६६० मेगावॅट येथील प्रस्तावित प्रकल्पाचे ३ नविन प्रत्येकी ६६० मेगावॅट प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे.

**औरंगाबाद पॉवर कं. लि. आणि धुळे पॉवर कं. लि.**: या संस्था विविध औष्णिक प्रकल्प (ग्रीन फिल्ड म्हणून) भारत सरकारच्या वीज मंत्रालयाच्या (केस २) मार्गदर्शक तत्वानुसार उभारल्या आहेत. औरंगाबाद पॉवर कंपनी ली. ही आता मागणी करणारे मे. एम.एस. इलेक्ट्रीसिटी डी. कं.लि. या नावाने कार्यरत आहे.

**यूसीएम कोळसा कं. लि.**: युसीएम कोळसा कं. लि. ही संस्था आपली कं. आणि उत्तर प्रदेश राज्य विद्युत उत्पादन निगम लि.छत्तीसगड खाण विकास महामंडळ (सीएमडीसी) यांच्यातील परिक्रमा आहे. ही चेंदीपाडा आणि चेंदीपाडा II येथील कोळसा संयुक्तपणे वापरते. यातील म.रा.वि.नि.कं.म. हिस्सा (२×६६० मेगावॅट) डोंडीचा येथील वीज प्रकल्पासाठी वापरण्यात येईल.

**अपांरपारिक उर्जा स्त्रोत उभारण्यासाठी कंपनीने घेतलेला पुढाकार (सौर उर्जा निर्मिती)**: सौर उर्जेची प्रचंड क्षमता लक्षात घेता महानिर्मितीने सौर उर्जा (पीव्ही) आधारीत व मेगावॅट क्षमतेची सयंत्रे उभारण्याचे नक्की केले आहे. हे सयंत्र नवी पुननिर्मित उर्जा खाती अपारंपारिक उर्जा स्त्रोत भारत सरकार, मंत्रालय यांच्या मार्गदर्शनानुसार उभारले जाणारे आहे. हे १ मेगावॅट सौरउर्जा सयंत्र चंद्रपुर येथे उपलब्ध जागेत उभारले जाणार आहे. याचे कंत्राट मे. मोझरबेअर्स इंडिया लि. नवी दिल्ली यांना ११.०६.२००९ रोजी देण्यात आले आहे. प्रकल्प मार्च २००९ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**नव्या प्रकल्पासाठी निधी सोय / व्यवस्था**: सर्व नियोजित क्षमता वाढविणारे प्रकल्प यांच्यासाठी लागणारा निधी ८०:२० ऋण समतुल्यता गुणोत्तरात उभारले जातील. कंपनी आपल्या महसूलाचा काही भाग वर्गणी म्हणनू या प्रकल्पाचे समभाग उभारण्यात वापरील प्रकल्पाचा ८० टक्क्यापर्यंतचा खर्च अर्थ व्यवहार संस्थांकडून घेतलेल्या निधीतून केला जाईल २० टक्के निधीसाठीचे समभाग हे मुख्यत: महाराष्ट्र राज्य सरकारकडून घेतले जाईल.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**पत श्रेयता (क्रेडिट रेटींग)**: मे. क्रेडीट ऍनालिसीस ऍण्ड रिसर्च मर्यादित CARE या मान्यवर संस्थेने कंपनीचे क्रेडीट रेटींग ह्या दीर्घकालीन कर्ज वा लघुकालीन कर्ज या दोन्ही करता तपासलेला असून त्यांनी आपल्य कंपनीला अे मानक (उच्च श्रेयता) प्रदान केली आहे. लघुकालीन कर्जासाठी पी.आर.आय (PRI) म्हणजे कमीत कमी धोका अशी शिफारस कंपनीला या संस्थेकडून मिळाली आहे.

**इंधन सुरक्षा**: आपली प्रस्थापित वीज उर्जा निर्मिती क्षमता ही बहुतांशी औष्णिक उर्जा आहे. यामुळे कंपनी फार मोठ्या प्रमाणात कोळसा या इंधनावर अवलंबून आहे. पुरेसा, वेळीच व उत्तम प्रतिचा कोळसा पुरवठा होणे हे आपल्या सातत्याने वीजनिर्मिती करुन जनतेला पुरवणे या कार्यातील अति महत्वाचे गमक आहे. त्यासाठी आपल्या कंपनीने कोल इंडियाच्या विविध दुय्यम संस्थांनांशी दीर्घकालीन संबंध प्रस्थापित केले आहेत. याशिवाय ओरिसा राज्यातील मच्छीकाटा व महानंदा कोळसा क्षेत्र हे कायम स्वरुपी हक्काचे म्हणून आपली दुय्यम कंपनी महागुज कॉलीअरीज तर्फे मिळवलेले आहेत. या खाणीमधून मिळणारा कोळसा दुसऱ्या टप्प्यात नियोजित विस्तार कार्यक्रमात उपयोगी पडणार आहे. याशिवाय काही पुर्नबांधणी प्रकल्पातही या कोळसाचा उपयोग होईल. आपल्या कंपनीला उत्तर प्रदेश राज्य विद्युत निगम मर्यादित यांच्याकडून चांदीपाडा व चांदीपाडा इथे आणि छत्तीसगड मिनरल कंपनीकडून कोळसा काढण्याचे अधिकार मिळाले आहेत.

अपुऱ्या इंधन साठ्यावर मात करण्यासाठी कंपनीने २.० दशलक्ष मेट्रिक टन चांगल्या प्रतिचा कोळसा परदेशातून आयात करण्याचे ठरविले आहे. हा कोळसा नासिक, भुसावळ, परळी, खापरखेडा, कोराडी आणि चंद्रपूर येथील विद्युत केंद्रांना पुरवण्यात येणार आहे. याच्या सोबत आपल्या कंपनीने ०.३८ दशलक्ष मेट्रिक टन परदेशी कोळसा परळी, खापरखेडा व चंद्रपूर येथे निविदा काढून पुरवला आहे.

कंपनीने वायु खरेदी आणि पुरवठा करार (GSPA) मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. (RIL) सोबत केला आहे. ज्याच्या अन्वये ०.९३ MMSCMD नैसर्गिक गॅस (वायु) हा कृष्णा गोदावरीच्या खोऱ्यातून $4.205/MMBTU एवढा मिळेल.

**नजीकच्या काळासाठी उपाययोजना:** विद्युत केंद्राची (पॉवर स्टेशनची) कोळशाची मागणी पूर्ण करण्यासाठी कंपनीने १.० दशलक्ष मेट्रिक टन स्वदेशी कोळसा, लिलावातील राखीव भागातून मे. एससीसीएल यांच्याकडून रु. ९५०/- प्रति मे.टन ज्यादा किंमत देऊन घेण्याचे ठरविले आहे. २००८-०९ साली अशा लिलावातून खरेदी झाली नाही परंतु २००९-१० साली मे. सिंगारेनी कोलीयरीज कं. लि. कडून 330T4MT एवढी खरेदी झाली.

**मानव साधन संपत्तीचे व्यवस्थापन:** आपले कर्मचारी ही कंपनीची सर्वात मोठी संपत्ती होय. त्यांच्या उत्तम कार्यक्षमतेसाठी सभोवतालचे वातावरण हे सतत उत्साहवर्धक आणि सृजनशील ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची असून नव संकल्पना/सृजनता यांना प्रोत्साहित करण्यासाठी आपल्या कंपनीने सतत प्रयत्न केले आहेत. कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता वाढविणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन कंपनीने पाऊले उचलली आहेत. शिक्षित, तंत्र-विशारद आणि बहुविध शिक्षित तज्ञ असे कर्मचारी हे महानिर्मितीकडे असलेले मोठे भांडवल आहे. त्यांच्या क्षमतेच्या सामर्थ्यावरच कंपनी नविन आव्हाने पेलू शकते. आपल्या कंपनीची सांघिक श्रेष्ठता तत्वावर पूर्ण श्रद्धा आहे आणि म्हणूनच माणूस (कर्मचारी) हित प्रथम हे तत्व पाळले जाते.

आपली कंपनी आता मोठ्या प्रमाणात विस्तारित होणार असल्यामुळे नविन प्रशिक्षित कर्मचारी जे यंत्र हाताळू शकतील, अशांची गरज आहे. २०१२ पर्यंत केलेल्या आराखड्यानुसार ९८० कर्मचारी भरती केले तसेच ही प्रक्रिया पुढे चालू आहे. कर्मचाऱ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्मिती करण्यासाठी केलेल्या कामाचे मूल्यांकन व बदलत्या नियमांची पारदर्शकता लागू करण्यात येणार आहे. ३१.३.२००९ रोजी कर्मचारी संख्या १५२४९ आहे.

**औद्योगिक संबंध:** कंपनीतील कर्मचाऱ्यांशी व्यवस्थापकिय संबंध हे सौहार्दपूर्ण असेच राहिले आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्य कामासंबंधी अधिक प्रशिक्षित व कार्यक्षम करण्याच्या हेतूने अभ्यासवर्ग सर्व स्तरांवर घेतले जातात. सभोवार सतत बदलत्या स्थितीविषयी / तंत्रज्ञानाविषयी आणि एकूण परस्पर संबंधी होणाऱ्या बदलांबद्दल त्यांना अधिक संवेदनशील करण्यासाठी या अभ्यास-गटांचा उपयोग होत असतो. एकंदरीत पाहता कंपनीतील औद्योगिक नातेसंबंध स्थिती ही शांतीपूर्ण अशीच राहीली आहे. त्यात परस्पर विश्वास व सुसंवाद साधणारा असाच धागा नेहमी राखला जातो. व्यवस्थापन आणि युनियन यांच्यातील पगार वाढीच्या कराराची अंमलबजावणी एप्रिल २००८ पासून लागू करण्यात आलेली आहे.

कोणत्याही कर्मचाऱ्याचे वार्षिक उत्पन्न २४,००,०००/- किंवा २,००,०००/- प्रति महिना नाही. ही माहिती कंपनी कायदा १९५६ नुसार (कर्मचाऱ्यांविषयी) नियम १९७५ नुसार प्रस्तुत करण्यात आली आहे.

**अनुसूचित जाती, जमाति व इतर मागास वर्गासाठी राखीव जागा**: आपल्या कंपनीने सरकारची वेळोवेळी देण्यात आलेल्या नियम व अटीनुसार नोकरभरती व बढतीसाठी व्यवस्था केलेली आहे.

**प्रशिक्षण आणि विकास**: महामंडळाच्या संस्कृतीला साजेल अशा निगमी दूरदृष्टीनुसार सर्वोत्तम, सुपरिणामी, सक्षम अशी या देशातील वीज निर्मिती संस्था आपल्याला ठरले पाहिजे, यासाठी आपली कंपनी कर्मचारी वर्गाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी सतत कार्यरत आहे. कंपनीची स्वत:ची दोन प्रशिक्षण केंद्रे आहेत. कोराडी व नाशिक येथे प्राथमिक स्वरुपाचे प्रशिक्षण प्रदान केले जाते. शिवाय अधिकारी वर्गासाठी विविध स्वरूपाच्या कामाचे प्रशिक्षण प्रदान करण्यात येते. यात वीज निर्मिती कारखान्याचे दैनंदिन कार्य व त्याचा विकास याचा समावेश आहे. तसेच आपल्या कंपनीने ७ प्रशिक्षण केंद्र स्थापन केली आहेत ज्याचा वापर त्या ठिकाणची प्रशिक्षणे गरजेनुसार पूर्ण करण्यासाठी वापर होईल.

याशिवाय गरजेनुसार कंपनीने पुणे येथे 'यशदा' या केंद्रावर इएससीआय, हैद्राबाद, भेल, वर्ल्ड बँक, एन पी आय टी व इतर बाहेरील केंद्रे अशा ठिकाणी ओ ॲन्ड एम (O & M), एमडीपी (MDP), सुरक्षा प्रकल्प, व्यवस्थापन आणि वागणूकीचे शास्त्र इ. विषयात आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करेल. गतवर्षी एकूण ८० प्रशिक्षण कार्यक्रम विविध कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आले.

**मराठी भाषेचा वापर**: आपली कंपनी दैनंदिन व्यवहार तसेच सरकारी खात्यांशी होणारा पत्र व्यवहार मराठी भाषेतून करण्यासाठी नेहमीच जागरूक असते. वार्षिक अहवाल / लेखा परिक्षणे इ. तांत्रिक अहवाल मराठी भाषेतून सादर केल्या जातात.

**दर नियामक खाते**: नियामक खात्याची पुनर्बांधणी करून "नियामक आणि व्यापारी खाते" असे नामकरण केले. हे खाते केंद्र व राज्य सरकारच्या नियमानुसार कार्य करील. नव्यानेच स्थापण्यात आलेले "नियामक आणि व्यापारी खाते" (RCD) पुढील बाबींची देखील काळजी घेईल. वीज खरेदी करार (PPA), वीज विक्रीच्या शक्यता अपेक्षित ग्राहकांपर्यंत पोहचविणे, जादा वीज निर्मितीची शक्यता पडताळणे, ग्राहकांची वीज बिलं बनविणे, इ, हे खाते महाराष्ट्र वीज नियामक मंडळासाठी सरासरी (MERC) आर्थिक गरजेनुसार दर ठरवते. वार्षिक अहवाल आढावा २००८-०९ व दरपत्रक २००९-२०१० करीता लेखी स्वरुपात देण्यात आला आहे. महाराष्ट्र वीज नियामक मंडळाने दि. १७.७.२००९ रोजी आदेश दिला आहे. दर ठरविण्यासाठी परळी संच ६ व पारस संच ३ यांनी महाराष्ट्र वीज नियामक मंडळाला दोन वेगळे लेखी अर्ज दिले आहेत. परळी संच ६ चा अर्ज २१.१०.२००९ रोजी समंत झाला आहे परंतु पारस संच ३ चा आदेश अजून आला नाही.

आदरणीय वीज पुनर्विचार न्यायालयाने (दिल्ली) दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र वीज नियामक मंडळाने मध्यवर्ती वीज संशोधन संस्थेच्या स्वतंत्र अभिकरण संस्था म्हणून स्थापना करून तिच्या अभ्यासासाठी आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या औष्णिक वीज केंद्राची सिद्ध कृतीशील परिमाणे परत बसवण्यासाठी विस्तार केला. सर्व वीज केंद्राच्या चाचण्या पूर्ण झाल्या असून मध्यवर्ती वीज संशोधन संस्थेने त्याचा अहवाल महाराष्ट्र वीज नियामक मंडळाला सादर केला आहे.

**पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा**: पर्यावरण स्तर सांभाळण्यासाठी आपल्या कंपनीने सर्वत्र विशेष काळजी घेतलेली आहे. त्यातले काही उपाय पुढे दिले आहेत:-

**वृक्ष लागवड व हरीत पट्टे यांचा विकास**: महानिर्मितीने वनीकरणाची मोठी योजना हाती घेतली असून या बहुतांश महानिर्मितीच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या परिसरात आहेत. ३१.३.२००९ पर्यंत सुमारे २८

लाख झाडे वाढवलेली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परिमाणानुसार हिरवळ पट्टे हे सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्राभोवती विकसित केलेले आहेत. २००८-०९ या वर्षात ५० हजार नविन झाडे लावण्यात आली.

**धुरांडी व धूर नियंत्रण:** महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने ठरवलेल्या ध्येय - धोरणांनुसार महानिर्मितीने आपल्या जुन्या झालेल्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधील हवेत निघणारा धूर SPM नियमानुसार जुन्या १७ संच मध्ये नियंत्रित केलेला आहे.

उर्वरित १० जुन्या संचला एसपीएम पद्धत लागू करण्यासाठी प्रदूषण मंडळाने ठरवले आहे की निघणाऱ्या वायुवर अमोनियाची क्रिया करायची त्याप्रमाणे AFGC पद्धतीनुसार कोराडी संच ७ येथे ही सुरुवात केली आहे आणि याचे निरिक्षण केले जाईल. कोरडी संच ७ येथील प्रयोग यशस्वी झाल्यास इतर केंद्रांवर त्याची सुरुवात केली जाणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आखून दिलेल्या नविन उत्सर्जन नियमांना अनुसरण्यासाठी इएसपी रेट्रोफिटींगचे काम करण्यासंबंधी मेसर्स भेल यांच्याबरोबर समजुतीच्या मसुद्यावर सह्या करण्याची प्रस्ताव प्रक्रिया सुरु आहे.

**वातावरणाची गुणात्मकता:** सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधली वातावरणाची गुणात्मकता सतत लक्षपूर्वक तपासली जाते व ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवलेल्या मर्यादेनुसार असल्याची खात्री करण्यात येते.

**आरोग्यदायी वातावरणासाठी सुरक्षा तपासणी:** वातावरण, आरोग्य व सुरक्षा यांची नियमित तपासणी ही २००४-०५ वर्ष काळात केंद्रीय कामगार संस्थेने केली आहे. सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्रामध्ये त्यांच्या शिफारसी अंमलात आणल्या आहेत. अंतर्गत तपासणी वर्ष २००७-०८ मध्ये केली गेली.

**राखेचा वापर:** महानिर्मितीने राखेचा वापर अधिक परिणामकारक केलेला आहे. ही सुधारणा गेल्या ४ वर्षातील आहे. त्याची आकडेवारी खाली दिल्याप्रमाणे

| वर्ष | राख वापर टक्केवारी |
|---|---|
| २००४-०५ | १५.९५ |
| २००५-०६ | २४.१० |
| २००६-०७ | २७.०० |
| २००७-०८ | ३०.६० |
| २००८-०९ | ४३.२३ |

पारस केंद्रातील ८०.५०%, भुसावळ ७४.८०% आणि खापरखेडा औष्णिक केंद्रात ५३.८६% राख वापर २००८-०९ या वर्षकाळात साध्य झाले.

**औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून निघणाऱ्या राखेचे उपयोग/उपयुक्तता ही वाढविण्यासाठी संशोधन प्रकल्प.**

**खाणे भरणे:** खाण खड्डा भरणी दुर्गापूर भूगर्भ खाणीत १ लाख घन मी () टीआयएफएसी आणि डब्ल्यु.सी. एल. च्या सहाय्याने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र येथे केले आहे. मेसर्स डब्ल्यु.सी.एल. पूर्ण प्रकल्पामध्ये तीन समभाग करण्यासाठी जोर देत आहे. तीन समभाग म्हणजे चंद्रपुर औ.वि.कें., मेसर्स टी.आय.एफ.अे.सी आणि मेसर्स डब्ल्यु.सी.एल. या तिन्ही कंपनीला समभाग कोळसा या खाणीतून मिळेल.

**निसृत पाणी वापर यंत्रणा:** महानिर्मितीने आपल्या विविध औष्णिक वीज निर्मिती केंद्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्याची सोय करणारी यंत्रणा बसवली आहे. अशाप्रकारे पुनर्वापर केलेल्या पाण्याची टक्केवारी पुढे दिल्याप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| १. | भुसावळ | ३७.५२% |
| २. | चंद्रपुर | ३५.५३% |
| ३. | कोराडी | ५६.०८% |
| ४. | खापरखेडा | ८८.४५% |
| ५. | नाशिक | ७०.०६% |
| ६. | परळी | ३७.१२% |
| ७. | पारस | ३१.१७% |

**पर्यावरण आणि जंगल खात्याकडून नवीन प्रकल्पांमुळे पर्यावरणास हानी पोहचणार नसल्याबद्दल मिळालेल्या शेऱ्यांची स्थिती**

अ) भुसावळ १×२५० मेगावॅटचे व परळी १×२५० मेगावॅटचे सयंत्र पुर्नउभारणी कार्यक्रम तसेच चंद्रपूर येथे २×२५० मेगावॅटचे विस्तारीत प्रकल्पाकरिता वातावरण शुद्धीसाठी परवानगी अनुक्रमे २८/०८/२००८, ९/०९/२००८ व ३०/०९/२००८ या दिवशी मिळविण्यात आली आहे.

ब) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कडून पुढील प्रकल्पांना बांधणीसाठी मंजुरीपत्र देण्यात आले.

१×२५० मेगावॅटचा भुसावळ बदली प्रकल्प - २१/०८/२००८

१×२५० मेगावॅटचा परळी बदली प्रकल्प - २१/०८/२००८

२×५०० मेगावॅटचा चंद्रपूर विस्तारीत प्रकल्प - ३१/१२/२००८

क) पुढील प्रकल्पांना पर्यावरण क्लिअरन्स पत्र मिळण्याची प्रक्रिया सुरु आहे.

१×२५० मेगावॅटचा पारस बदली प्रकल्प

२×६६० मेगावॅटचा डोन्डाईचा वीज प्रकल्प

१×६६० मेगावॅटचा यवतमाळ वीज प्रकल्प

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# माहिती तंत्रज्ञानातील पुढाकार

**अ) महानिर्मितीसाठी स्वतंत्र लॅनची उभारणी**

पूर्वी महानिर्मिती इंटरनेट व इतर साधनांसाठी महाविरणचा लॅन वापरीत असत. महानिर्मितीने मार्च २००८ मध्ये सुमारे दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर स्वतंत्र लॅनची उभारणी केली महानिर्मितीच्या लॅनशी सुमारे २०० संगणक व १५० लोक इंटरनेटचा वापर करतात. महानिर्मितीने इंटरनेटच्या २ मेगाबाईट प्रति सेंकदच्या लाईन्स भाडेतत्वावर घेतल्या आहेत.

**ब) निर्मिती नियंत्रण कक्ष (जनरेशन कंट्रोल रुमशी) संबंधित कार्यक्रम**

आधुनिक माहिती तंत्रज्ञानावर आधारीत सेवांचा उपयोग करुन मुंबईतील वांद्रामधील प्रकाशगड या सांघिक कार्यालयामध्ये सर्व सोयींनी युक्त अशा निर्मिती नियंत्रण कक्ष (जनरेशन कंट्रोल रुम) उभारायचे आहे. प्रकाशगड येथील मुख्य कार्यालय व इतर वीज केंद्र यांच्यामध्ये योग्य प्रकारे संपर्क यंत्रणा प्रस्थापित करुन कार्यक्षमता, निदान व त्यावरील उपाय यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे.

**नियंत्रण कक्षाची उद्दीष्टे**

अ) विविध संयंत्राची निर्मिती किंमत व त्यांची कार्यक्षमता यांचे मध्यवर्ती नियंत्रण शक्य करणे.

ब) निर्यात बिंदूजवळ स्थापित केलेल्या वीज यंत्रामधून माहिती मिळवणे.

क) निर्मितीमूल्य कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठीच्या आवश्यक सूचना प्रत्येक केंद्राला देण्यासाठी प्रत्येक केंद्राला देण्यासाठी निर्मिती नियंत्रण कक्षाला सक्षम करणे.

ड) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित च्या सर्व ठिकाणच्या सयंत्र व संचची इत्यंभूत माहिती मिळवण्यासाठी सक्षम करणे.

प्रकाशगड येथे निर्मिती नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली असून सर्व प्रकारची यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. वीज केंद्रातून माहिती मिळवण्याचे काम पूर्ण झाले आहे आणि मराठीकरण कृती मॉड्यूल व एबीटी मॉड्यूल यांची चाचणी घेण्यात येत आहे. निर्मिती नियंत्रण कक्ष मार्च २०१० पर्यंत कार्यरत होणार आहे.

**क) सॅप (SAP) शी संबंधित कार्यक्रम**

संस्थेच्या सर्व ठिकाणच्या जास्तीत जास्त प्रक्रिया सामावून घेण्यासाठी उपक्रम साधनसंपत्ती नियोजन (ERP) लागू करण्याची प्रक्रिया महानिर्मितीत सुरु आहे. ERP आपल्या कंपनीला माहितीचे जलद व संक्रमण व त्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत करणार आहे. त्याचप्रमाणे उत्पादन क्षमता वाढवणे, निर्मितीमूल्य कमी करणे, माहिती सातत्य सुधारणे, ज्ञानाची देवाणघेवाण आणि अंदाजप्रक्रिया व योजनाप्रक्रियेचे सामायिकीकरण करण्यात मदत होणार आहे. सॅप (SAP) ची संपूर्ण अंमलबजावणी डिसेंबर २०११ पर्यंत अपेक्षित आहे.

**ड) मुख्य कार्यालयात सॉप्टवेअर प्रस्थापित करण्यासंबंधिचे कार्यक्रम प्रकाशगड येथील मुख्य कार्यालयात पुढील सॉप्टवेअर प्रस्थापित करण्यात आली आहेत.**

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**अ) कोळसा व्यवस्थापक**

कोळसा व्यवस्थापक हे कोळसा व्यवस्थापन उपयुक्ततेवर आधारीत माहितीजाल आहे. ज्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) मासिक कोळसा कडी

२) विविध खाणींमधून रोज आलेल्या कोळशाची नोंद ठेवणे.

३) प्रत्येक वीज केंद्रात असलेल्या कोळशाच्या साठ्याची नोंद ठेवणे.

४) रेल्वे ट्रॅकिंग व्यवस्था - विविध कोळसा खाणीतून महानिर्मितीत येणाऱ्या बाधिणींच्या (रेल्वेच्या डब्यांची) स्थितींची नोंद ठेवणे.

५) प्रत्येक वीज केंद्रातील कोळशाचा साठा व येणारा कोळसा यांच्यातील दुव्यांचा अहवाल ठेवणे.

६) मिळालेल्या अहवालावर आधारित निर्णय असलेला सहाय्य करणे, सावधानता बाळगणे व विविध सावधान स्थिती संबंधीचे ई-मेल पाठवणे.

७) महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनी मर्यादीतसाठी धावणाऱ्या रेल्वेंसंबंधी माहिती मिळवण्यासाठी भारतीय रेल्वेशी सतत संपर्कात राहणे.

**ब) बॉयलर नलिका गळती व्यवस्थापक**

बॉयलर ट्यूब लिकेज फेल्युअरचा आढावा घेण्यासाठी उपयुक्त असे माहितीजनक ज्यात खालील मॉड्युल्स समाविष्ट आहेत.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

१) बॉयलर ट्यूब लिकेज फेल्युअरचा आढावा घेणे.

२) अहवाल निर्मिती

३) बॉयलर ट्यूब लिकेज फेल्युअरची मागील माहिती तोट्यावर आधारीत आलेख व आलेखिय निवेदन.

४) अहवाल व आलेखांवर आधारित निर्णय क्षमतेला सहाय्य करणे.

५) बॉयलर ट्यूब लिकेज फेल्युअरच्या महत्वाच्या कारणांचा शोध घेण्यास मदत करणे.

**क) गरजेनुसार सॉफ्टवेअर प्रस्थापित करणे.**

माहितीनुसार तंत्रज्ञान विभागाने इतर विभागांच्या गरजेनुसार इतर सॉफ्टवेअर प्रस्थापित करण्यात आले आहेत.

१) इमारत बांधणी भत्ता - एक्सेल या सॉफटवेअर मध्ये इमारत बांधणी भत्याच्या मासिक हप्त्याचे हिशोब तयार करण्यासाठी.

२) आयकराचा हिशोब ठेवण्यासाठी सॉफ्टवेअर

३) महानिर्मितीसाठी नवीन वेबसाईटची निर्मिती व त्यांची अंमलबजावणी करणे.

४) प्रकाशगड येथील मुख्यालय व आंतरजाल निर्मिती करणे.

५) ज्ञानधिष्ठित मंच आणि ई-मॅगझिन हे निर्मिती प्रक्रियेत आहेत.

६) प्रशिक्षण माहिती राखण्यासाठी ट्रेनिंग डाटा मॅनेजर

७) सर्व वीज केंद्रासाठी मध्यवर्ती माहिती निर्मिती करणे.

८) कोल मॉड्यूल साठी भ्रमण ग्राहक

९) गरजेनुसार पीजीएमएस मध्ये बदल

१०) इंधन व्यवस्थापन कक्षासाठी अहवाल निर्मिती, माहिती नोंदणी सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहेत.

**संचालक**

यावर्षी श्री. राहुल अस्थाना, सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र सरकार, हे २६/८/०८ पासून दुसऱ्या विभागात झाल्यामुळे कंपनीचे संचालक म्हणून राहिले नाहीत.

यावर्षी श्री. पी.पागे १/१२/०८ कंपनीचे स्वतंत्र संचालक (वित्तीय विशेषत:) म्हणून नियुक्त केले गेले.

महानिर्मिती मंडळाने श्री. पी.व्ही.पागे यांची ऑडिट कमिटीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली गेली. ३१/८/०९ पासून श्री. व्ही.टी.बापट यांच्या जागी श्री. सी.एस्.थोटवे यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

संचालक मंडळ श्री. राहुल अस्थाना व श्री. व्ही.टी. बापट यांनी कंपनीच्या प्रती केलेल्या सेवेचा गौरव इथे नमूद करु इच्छिते. मंडळावर नव्याने झालेल्या सभासदांचे हे मंडळ हार्दिक स्वागत करीत आहे.

**लेखा परिक्षण समिती**

महानिर्मितीची लेखा पारक्षण समिती संघटित करण्यात आली आहे. श्री. पी.व्ही.पागे हे या समितीचे अध्यक्ष असून श्री.जी.जे. गिरासे, संचालक (वित्त) आणि श्री. एम्.आर.शेलार हे संचालक समितीचे सदस्य आहेत. यावर्षी लेखा परिक्षण समितीच्या तीन बैठका झाल्या आहेत.

**संचालकांच्या जबाबदारी संबंधी निवेदन**

कंपनी कायदा १९५६ चे कलम २१७ (व) (ए) (ए) अनुसार संचालकांच्या जबाबदारी बद्दल निवेदन इथे देण्यात आले आहे.

१) वार्षिक हिशेब ताळेबंद हे लागू असलेल्या मानक विनिर्देशनानुसार तयार केले असून योग्य तो खुलासा या विनिर्देश बाहेर गेलेल्या बाबी बद्दल दिला गेला आहे, याची खातरवजा करणे.

२) निव्वळ /निश्चित केलेली हिशोब/लेखा लिखाण धोरणे योग्य प्रकारे आणि सतत लागू केलेली आहेत व निवाडा निर्णय आणि अंदाजपत्रके ही सुयोग्य आहेत व विवेकपूर्ण पद्धतीने बनवली गेली आहेत. जेणेकरून दिनांक ३१ मार्च, २००९ पर्यंत कंपनीच्या स्थितीचा सुयोग्य आढावा घेता येऊ शकेल, आणि कंपनीच्या नफ्याचे परिक्षण करता येईल.

३) संचालकांनी योग्य, पुरेसा वेळ व काळजी घेऊन लेखा पद्धतीचे विवरण देणारी कागदपत्रे/बुके, दप्तरे ही कंपनी कायदा १९५६ नुसार तयार केली आहेत, जेणेकरुन कंपनीची संपत्ती, मालमत्ता यांची सुरक्षा सुनिश्चित राहील आणि कुठलीही अफरातफर होण्यापासून कंपनी वाचू शकेल अथवा झालेली अफरातफर उघडकीस आणता येईल.

४) चालू नित्य व्यवसाय या आधारेच आर्थिक वर्ष जे ३१ मार्च २००९ रोजी संपते, त्याचे वार्षिक लेखा हिशोब तयार केले गेले आहेत.

**ऊर्जा संधारण व नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे व परकीय चलन अर्जन:**

ऊर्जा संवर्धनाबद्दल माहिती, नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे व परकीय चलन मिळकत व खर्च याबद्दलची माहीती कलम २१७(१)(ई) कंपनी कायदा १९५६ नुसार अनुसूची (अ) या अहवालाच्या भागात दिली आहे.

**नियत ठेवी**

कंपनीने कुणाकडूनही अशा नियत ठेवी (फिक्स्ड डिपॉझिट) मागवल्या नाहित अथवा कुणाच्याही अशा ठेवी कंपनीकडे नाहीत.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**विमा**

कंपनीची सर्व मालमत्ता/संपत्ती इत्यादींचा पूर्ण विमा संरक्षण घेतला आहे.

**परिव्यय लेखा परिक्षक (कॉस्ट ऑडिटर्स)**

कंपनीने मेसर्स एन्.आय. मेहता कंपनी आणि मेसर्स एस्.आर. भार्गवे आणि कंपनी, यांना ३१/३/२००९ ला संपणाऱ्या वर्ष काळासाठी परिव्यय लेखा परिक्षक म्हणून संयुक्तपणे कंपनीचे व्यवहार तपासण्यासाठी नेमले आहे. ही नेमणूक केंद्र सरकारच्या सांघिक कारभार मंत्रालयाकडून मंजूर होणे अपेक्षित आहे.

**लेखा परिक्षक (ऑडिटर्स)**

कंपनीचे संविधिक लेखा परिक्षक हे महालेखाकार वाणिज्यिक, लेखापरिक्षा यांचेकडून नेमले जातात. मेसर्स फोर्ड ऱ्होड्स पार्कस् ॲण्ड कंपनी, मुंबई व मेसर्स पी.जी. जोशी ॲण्ड कंपनी, नागपूर व मेसर्स पी.जी. भागवत ॲण्ड कं. पुणे हे संयुक्तपणे संविधिक लेखा परिक्षण आर्थिक वर्ष २००८-०९ या काळाच्या या अवधीतील व्यवहारासाठी नेमलेले आहेत.

मेसर्स जी.एम. कपाडिया आणि कंपनी, मुंबई, मेसर्स के.एस्.अय्यर आणि कंपनी, मुंबई व मेसर्स सी.व्ही.के. अॅन्ड असोशिएट्स, मुंबई यांची २००९-२०१० साठी संयुक्तपणे संविधिक लेखा परिक्षक म्हणून महालेखाकार व लेखापरिक्षक, न्यू दिल्ली यांच्याकडून नेमणूक करण्यात आली.

**अभिस्वीकृती आभार**

कंपनीचे संचालक केंद्र सरकारचे अधिकारी, कर्मचारी, आर्थिक संस्था, बँका, संविधिक लेखा परिक्षक, परिव्यय परिक्षक, केंद्रीय व राज्य स्तरीय वीज नियामक अधिकारी, अपील प्राधिकारीय आणि कंपनीचे भागधारक या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत म्हणून त्या सगळ्यांचे आभार मानतो आहोत, संचालक मंडळ कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांचेही इथे आभार मानीत आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने**

**पी. अब्राहम** — अध्यक्ष

**सुब्रत रथो** — व्यवस्थापकिय संचालक

स्थळ: मुंबई

दिनांक: ३०.१२.२००९

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# पूरकपत्र अ

## कंपनीच्या अंतर्गत येणारे तपशील (मंडळाचे संचालकांच्या अहवालाचे तपशील) नियम १९८८ नुसार:

## ऊर्जा संवर्धन

### २००८-२००९ या कालावधीत खालील ऊर्जासंवर्धन:

(१) ऊर्जावापर तपासणी - संपीडीत वायु, पाणीपुरवठा, थंड पाणी व्यवस्था आणि तापक यांची तपासणी.

(२) शक्ति केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्गातील ऊर्जाबचती संबंधी जाणीव वाढवणे, त्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन.

(३) ऊर्जासंवर्धन या विषयावरील भित्तीपत्रके व निबंध स्पर्धांचे आयोजन करून ऊर्जाबचतीची जागृती.

(४) महानिर्मितीकडे अभियंतांचा एक ताफा आहे जे ऊर्जा संवर्धनचे काम करतात व ऊर्जावापर तपासणी करतात त्यांच्या ज्ञानाचा फायदा महानिर्मितीला आपल्या दैनंदिन कार्यप्रणालीत होतो.

## सहाय्यकारी ऊर्जा वापर

१) ०.२ वर्ग ऊर्जामीटरच्या वापराने सहाय्यक ऊर्जा वापराची तंतोतंत आकडेवारी मिळते.

२) सूर्यप्रकाशाचा पूर्ण उपयोग.

३) कार्यरत नसलेली यंत्रे, उपकरणे, दिवे बंद करणे.

४) प्रकाशयोजनेत कमी ऊर्जेत सर्वाधिक प्रकाश देणाऱ्या साधनांचा वापर करणे.

५) संपीडीत वायुयंत्रणा, वाफ वाहक नळ, सयंत्र थंड करणाऱ्या जलवाहिन्या व वीजवाहकातील गळती थांबवणे.

६) डी. एम. पाणी प्रवाहमापक बसवले आहेत.

७) नैसर्गिक थंडावा देणाऱ्या पद्धती उरण केंद्रातील वायू/औष्णिक संचमध्ये बसवल्या आहे.

८) सहाय्यक यंत्रणेची वेळोवेळी पाहणी करून वेळीच त्यांची दुरूस्ती करून अपव्यय टाळणे.

## प्रकाश योजना

१) अतिउच्च शक्तीचे जुने एचपीएमव्ही दिवे बदलून नवे एचपीएमव्ही दिवे बसवले आहेत.

२) विद्युती स्थैर्यभार आणि सी.एम.एफ. दिव्यांचा वापर.

३) इमारतीमधील जिथे पण वीजचक्की, तळघरासारख्या भागात प्रत्येक प्रकाशदायी दिव्यांची चालू बंद बटणे बसवली आहेत.

## उष्णता ऊर्जा

१) संधारित नळ सफाई यंत्रणेवर लक्ष ठेवणे.

२) औष्णिक विसंवहनला गरज पडताच दुरुस्त करणे.

३) हवेचे उष्णीकरण करणारी यंत्रंणा आणि भट्टी या स्वच्छ ठेवणे.

४) उखळणीमध्ये येणारी अतिरिक्त हवा प्रमाणित करणे.

५) अधिक्षक अभियंता/महाव्यवस्थापक/मुख्य महाव्यवस्थापक पातळीवर उष्णतादर आठवड्याला/पंधरवड्याला व दरमहा प्रमाणित करणे.

## वंगण

१) सर्व ऊर्जानिर्मिती कारखाने/संच येथील गळती पूर्णत: थांबवणे.

२) वाहत्या पाण्याबरोबर जाणारे तेल-पाण्यातील तेलांश काढून घेणारी चाळणी तयार केले आहेत.

३) भुसावळ व नाशिक औष्णिक वीज निर्मिती केंद्रात वीजचक्की व बी.एफ.पी. तेल गाळणारी अपकेन्द्री (सेन्ट्रीप्युगल) यंत्रणा बसवली आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## डीएम वॉटर

१) डीएम भरती रेखा व वायु गळती लगेच दुरुस्त केली जाते.

२) खापरखेडा औष्णिक वीज निर्मिती केंद्रात उखळणी नळ तपासणी यंत्रणा बसवली आहे.

## संकीर्ण पाणी

१) कोराडी, नाशिक, खापरखेडा, चन्द्रपूर येथील औष्णिक ऊर्जा निर्मिती केन्द्रात राखाडी थंड करण्यासाठी वापरलेले पाणी शुद्ध करण्याची यंत्रणा बसवली आहे.

२) अग्नीशमनासाठी जमिनीवर बसवलेले नळ जमिनीखालून वर आलेले असतात. त्यातील गळती थांबवणे प्राथमिकतेने केले जाते.

## तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि संशोधन व विकास

१) अमोनिया अंत:क्षेपण फ्यू वायु गॅस पद्धत स्थापणे.

२) परळी औष्णिक विद्युत केंद्र संच - ३ येथील वापर पद्धतीने सुधारीकरण.

३) दोन्ही मुख्य कार्यालये व उत्पादक केन्द्र या ठिकाणी साहित्य सामान इत्यादीच्या खरेदीसाठी 'ई' निविदाची अंमलबजावणी.

## भविष्यातील योजना

१) औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी ए.एफ.जी.सी. अवलंब.

२) ऑनलाईन ऊर्जा व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# लेखा परिक्षकांच्या अहवालातील बाबींचा खुलासा
## ०१.०४.२००८ ते ३१.०३.२००९

| अनु. | लेखापरिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| १) | सोबतचा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा ताळेबंद हिशेब तक्ता ३१ मार्च, २००९ पर्यंतच्या कालावधिचा आहे व नफा नुकसानीचा हिशेब तक्ता, जो त्याच तारखेला संपणाऱ्या वर्ष अखेरीचा आहे. तसेच रोकड प्रवाह तक्ता त्यावर उल्लेखिलेल्या वर्ष अखेरीसाठी आहे. ही सर्व कागदपत्रे व लेख आम्ही तपासले आहेत. आर्थिक व्यवहारासंबंधी ही हिशेब मांडणीची जबाबदारी पूर्णत: कंपनी व्यवस्थापनाची असून, आमची जबाबदारी त्यावर मत प्रदर्शन करण्यापुरती आहे. त्या मतप्रदर्शनास आमची तपासणी (ऑडिट) हा मुख्य आधार आहे. | वस्तुस्थिती |
| २) | भारतात सर्वसाधारणत: मान्यताप्राप्त अशा दर्जानुसार हे लेखापरिक्षण केलेले आहे. त्या मान्यताप्राप्त दर्जानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण हे पुरेशी, खात्रीलायक आर्थिक व्यवहारासंबंधी माहिती, तपशील मिळवून, तो तपशील कुठल्याही प्रकारचा संशयास्पद व्यवहार दाखवित नाही हे तपासतो. हे सर्व प्रकारचे आर्थिक तक्ते तयार करणे ही सर्वोतोपरी आस्थापन (कंपनी) व्यवस्थापनाची जबाबदारी असते. लेखा परिक्षणातंर्गत नमुन्यादाखल तक्त्यात दाखविलेले काही खर्च इत्यादिंची सत्यता पडताळून पाहणे, त्याचप्रमाणे लेखा परिक्षणातंर्गत लेखा तक्ते उभारणीत वापरलेली पद्धती ही मान्यताप्राप्त अशीच असल्याची खात्री करून घ्यायची असते. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाने एकंदरीतपणे आपले लेखा तक्ते सुयोग्य पद्धतीत सादर केले आहेत ना? हे पण तपासायचे असते. आमचा असा विश्वास आहे की, आमचे लेखा परिक्षण आम्ही दिलेल्या मतांसाठी पुरेसे व सुयोग्यपणे आधारभूत आहे. | वस्तुस्थिती |
| ३) | अ) कंपनी कायदा (लेखा परिक्षण अहवाल) २००३ यातील हुकुमान्वये, तसेच (कंपनी कायदा लेखा परिक्षण अहवाल), (सुधारित हुकुम २००४) जे भारताच्या केंद्र सरकारने प्रकाशित केले त्याच्या उपखंड ४ (अ) मूळ कलम २२७ कंपनी कायदा १९५६, च्या हुकुमातील परिच्छेद ४ व ५ यात सांगितलेले संबंधित विषयाचे तक्ते सोबत जोडत आहोत. | वस्तुस्थिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) | कंपनी कायदा १९५६, यांच्या उपनिर्देशांतर्गत खंड ६१९(३)(अ) व महालेखापाल (व्यावसायिक लेखा परिक्षण महाराष्ट्र) यांच्या ७ जुलै, २००९ चे पत्र क्रं. ए.जी/सी ए/सी ए डब्ल्यू-I / एफ - ३८१३ यांच्या संमती नुसार आम्ही हिशेब टीपातील टीप क्रं. २५, जी पूर्वोक्त उप निर्देशनानुसार माहिती उघड करते, त्याच्या उपलब्धतेप्रमाणे संदर्भ घेतला आहे. | वस्तुस्थिती |
| ४) | १. | आमच्या लेखा परिक्षण प्रक्रियेच्या पूर्ततेसाठी आम्ही सर्व प्रकारचे खुलासे, शंकानिरसन, कंपनी व्यवस्थापनाकडून मिळवलेली आहेत. | वस्तुस्थिती |
| | २. | आमच्या पाहणी परिक्षेत आढळून आल्याप्रमाणे आम्ही असे नमूद करतो की कंपनी कायद्यानुसार हिशेबाच्या सुयोग्य पद्धतीची पुस्तके/दप्तर इत्यादी या कंपनी व्यवस्थापनाने तयार करून ठेवली आहेत. | वस्तुस्थिती |
| | ३. | ताळेबंद पत्रक, महसूल जमा व व्यय यांचे पत्रक तसेच रोकड प्रवाह पत्रक जी या लेखा परिक्षणासाठी आमचे समोर आली ती या लेखा दफ्तरांशी मिळती जुळती आहेत असे दिसून आले आहे. | वस्तुस्थिती |
| | ४. | आमच्या मते या अहवालातील ताळेबंद पत्रक, नफा-तोटा हिशेब आणि रोकड प्रवाह पत्रक ही १९५६ च्या आस्थापन कायदा खंड २११ च्या उपखंड (३सी) च्या लेखा दर्जाच्या संदर्भात स्विकार संमत आहेत. परंतु यादीत समाविष्ट केलेल्या लेखा धोरण क्र. १(एफ) मधील यंत्रणा भागच्या धोरणाला भांडवलिकृत करून त्यांच्या किंमतीचे अवमूल्यन ठरवून, संबंधित उर्वरित जीवनापर्यंत करायला हवे होते, मात्र कंपनीने या धोरणाला स्वीकारले नाही आणि पुढे ही किंमत अवमूल्यन स्थायी मालमत्ता यांच्या लेखा मानक ६ आणि लेखा मानक १० यानुसार अनुसरले नाही. अशा शिल्लक यंत्रणाच्या रकमेबद्दल कंपनीमध्ये खात्रीलायक माहिती नाही. | सन २००७-०८ च्या महालेखापालांच्या परिक्षणामध्ये असे दर्शविण्यात आले की रु. ४३.४७ कोटीचे भांडवली सुटे भाग हे सामग्री साठ्यांमध्ये पडून आहे. परंतु त्याचे स्वरूप पाहता, ह्या सुट्या भागांचे भांडवलीकरण करावयास हवे होते. हे भांडवलीकरण आणि त्यावरील घसारा नोंद करण्यासाठी सुट्या भागांचे खरेदी कागदपत्र शोधण्याचे काम सुरू आहे. सन २००९-१० च्या लेख्यांमध्ये ह्याची योग्य नोंद केली जाईल. |
| | ५. | सरकारी अधिसूचना क्रं. जी.एस.आर. (८२९/(ई) दिनांक २१/१०/२००३ मधील सूचनेनुसार सरकारी आस्थापने यांना कंपनी कायदा १९५६ च्या कलम २७४ १(जी) यातील कलमातून सूट देण्यात आली आाहे | वस्तुस्थिती |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| | | |
|---|---|---|
| | ६. अनुसूची १५ मधील हिशेब तक्त्यावरील टीपेमधील टीप क्रं. २३ मध्ये पारस संच क्रमांक ३ आणि परळी संच क्र.६ मधील वीज विक्रीतून झालेल्या उत्पन्नाकडे लक्ष वेधण्यात आले आहे. | कंपनीने पारस संच क्रं. ३ च्या दरनिश्चिती करीता विद्युत नियमक आयोगाकडे याचिका दाखल केली आहे. परंतु आयोगाकडून दर निश्चित होणे बाकी आहे. यास्तव कंपनीने परळी संच क्रं. ६ याच्या दर वाढीच्या प्रमाणानुसार पारस संच क्रं. ३ चा महसूल गृहित धरला आहे. ही बाब नोंद क्रं. २३ व तक्ता १५ मध्ये दर्शविले आहे. |
| | (७) अ) दिनांक ६ जून २००५ या काळापर्यंत कंपनीची "स्थायी मालमत्ता" व "उत्तरदायित्वे (ॲसेटस व लायबिलिटीज्)" ही महाराष्ट्र वीज सुधारणा स्थानांतरण योजना २००५ च्या अंतर्गत निवेदन केल्यानुसार आहेत. आम्हाला सूचित केल्याप्रमाणे या सर्व शिल्लकी रकमा (बॅलन्सेस) महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनीने स्व:तचे अखत्यारीत धरलेल्या आहेत. या शिवाय पुढे असेही निवेदित करण्यात आले आहे की, अंतिम स्थानांतरण योजना (फायनल ट्रान्स्फर स्कीम) ही महाराष्ट्र सरकार कडून अद्यपि जारी केली गेलेली नाही. यास्तव कंपनीच्या ताळेबंद पत्रकात यासंबंधीची शिल्लकी रकमेची नोंद झालेली नाही. यात भविष्यकालीन होणारे बदल (जर काही झाले तर) हे कंपनीच्या आर्थिक पत्रकावर भरीव परिणाम करणारे ठरू शकतील. कंपनी हस्तांसंबंधी अनुसूची १५ टिप्पणी क्रमांक २ याकडे आम्ही लक्ष वेधीत आहोत. ही टिप्पणी कंपनी स्थानांतरण प्रक्रियेच्या मागील वर्षामधील कर्जदायित्त्व संबंधी असून त्यात चढणाऱ्या व्याजाचा अंर्तभाव आहे. सुत्रधार कंपनी (म.रा.वि.मं.) ने मान्यता दिल्यानुसार वरील सुधारित स्थानांतरण योजने अंतर्गत अशी ही बाब आहे. | वस्तुस्थिती |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| | | |
|---|---|---|
| | ब) किरकोळ येणी (देणेकरी), किरकोळ देणी (घेणेकरी), कर्जे आणि आगाऊ रक्कमा व इतर येणाऱ्या सर्वांची शिल्लक व इतर देय / श्रेय, शिल्लक रकमा, सुत्रधारी कंपनीच्या धरून व सुत्रधार कंपनीच्या इतर सहाय्यक कंपन्या यांच्याही देय / श्रेय, शिल्लक रकमा या सर्व ताडून जुळविणे बाकी आहे या जुळवणीचा परिणाम म्हणून नफा / नुकसान तक्त्यात काय बदल घडू शकेल हे सांगता येत नाही. | तिनही कंपन्यांच्या अधिकारी वर्गाचा एक कक्ष ताळमेळ करीता स्थापन करण्यात येईल. |
| | आमच्या परिच्छेद उपरोक्त ४(४) आणि ४(७) या परिच्छेदातील टिप्पणी प्रमाणे व आमच्या मतानुसार, आमच्याकडे उपलब्ध सुयोग्य माहितीनुसार आणि आम्हाला कंपनीकडून मिळालेल्या खुलाशाप्रमाणे वरील हिशेब (तक्ते) त्यावरील टिपा सहीत वाचले असता कंपनीकायदा १९५६, अनुसार आवश्यक माहिती देणारे ठरतात व ज्यापद्धतीने मांडणी आवश्यक आहे तशी ती झालेली आहे. या मांडणीवरून कंपनीच्या आर्थिक व्यवहाराचे खरेखुरे चित्र भारतात सर्वत्र स्विकृत केलेल्या मान्यता प्राप्त पद्धतीनुसार झाले आहे व त्यात खालील मांडणी समाविष्ट आहे. | वस्तुस्थिती |
| | अ) ताळेबंद तक्त्यात कंपनीच्या ३१ मार्च २००९ पर्यंतच्या व्यवहाराचे चित्रण प्रतीत होते. | वस्तुस्थिती |
| | ब) नफा नुकसान तक्त्यामध्ये या तारखेला संपलेल्या वर्षात झालेला नफा आणि | वस्तुस्थिती |
| | क) रोकड प्रवाह तक्त्यानुसार या तारखेला संपलेल्या वर्ष अखेरीस असलेली स्थिती दाखवतात. | वस्तुस्थिती |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# पूरकपत्र ब

लेखा परिक्षक यांच्या जोड अहवालातील तिसऱ्या परिच्छेदात उद्धृत केलेल्या विषयांचा खुलासा

| अनु. | | लेखापरिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|---|
| १) | अ) | स्थावर मालमत्ता, त्या मालमत्तेची मोजदाद इत्यादींचा तपशील कंपनीच्या पुस्तकात सापडत नाही. म्हणजे मालमत्तेची जागा, ठिकाण वगैरेची नोंद नाही. त्या मालमत्तेची इतर स्थावर संपत्तीशी संबंध वगैरेची नोंद कंपनी बुकात सापडत नाही. स्थावर मालमत्तेची किंमत ही स्थावर मालमत्ता दप्तरामध्ये नोंदलेल्या रकमांशी व ताळेबंद पत्रकात दाखवलेली स्थावर मालमत्ता किंमत यांचा मेळ बसत नाही. | तपशीलवार स्थावर मालमत्ता कार्यपद्धत याची दफ्तरमध्येच नोंद आहे ते हिशेबाच्या खंड ५ प्रकरण ५ मध्ये दाखवले आहे. आमच्या सर्व संचाना या नोंदी ठेवल्याबद्दल सूचना दिल्या आहेत. या प्रक्रियेनुसार स्थावर मालमत्तेच्या मोलाची जुळणी ताळेबंदावरून होऊ शकेल. |
| | ब) | आम्हांला देण्यात आलेल्या माहितीनुसार दर तीन वर्षांनी कंपनी आपल्या स्थावर मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी करते. कंपनीच्या आवाका व उद्योगाचे स्वरूप पाहता हे आमच्या मते योग्य आहे. आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये कंपनीने अशी प्रत्यक्ष पाहणी केल्याची नोंद आहे आणि ही नोंद स्थावर मालमत्ता दफ्तरमध्ये असलेल्या नोंदीशी मिळती जुळती नाही. | सर्व औद्योगिक घटक (संच) यांना स्थावर मालमत्तेच्या प्रत्यक्ष पडताळणीच्या मोलाशी मिळवणी स्थावर मालमत्ता दफ्तर बरोबर करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. |
| | क) | आमच्या तपासणी अंतर्गत येणाऱ्या कालखंडात कंपनीने कुठल्याही मोठा स्थावर मालमत्ता विक्री व्यवहार केलेला नाही. | वस्तुस्थिती |
| २) | अ) | व्यवस्थापन त्यांचे वस्तू, सामान इत्यादींची यादी ठराविक व योग्य कालांतराने प्रत्यक्षपणे करते असे दिसते. | वस्तुस्थिती |
| | ब) | आमच्या मते व आंम्हाला मिळालेल्या माहितीनुसार व खुलाशाप्रमाणे कंपनीच्या भांडाराची प्रत्यक्ष पडताळणी तपासणी ही व्यवस्थापनाकडून योग्य प्रकारे केली जाते. विशेषत: या कंपनीचा व्याप व उद्योगाचे स्वरूप पाहता ही पद्धत योग्य आहे. | वस्तुस्थिती |
| | क) | भांडाराच्या साठ्यांच्या याद्यांची पाहणी आणि तपासणी संबंधीचे अहवाल तपासल्यानंतर आमचे असे मत आहे की कंपनी त्या सगळ्याची योग्य प्रकारे नोंद इत्यादी ठेवते आहे. त्यात कुठलीही तफावत (केवळ कोळसा वापर माहिती सोडून) आंम्हाला आढळली नाही. कोळसा वापरा संबंधी काही तफावत योग्य प्रकारे हिशेबात समायोजित केल्या आहेत. व्यवस्थापन प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबरला ही पडताळणी करते जी ताळेबंद पत्रक संपण्याच्या दिवशी होत नाही. त्यामुळे ताळेबंद पत्रकाच्या भांडाराची प्रत्यक्ष पडताळणी दिवशीची प्रत्यक्ष मालसूची व संग्रह नोंद वही यामध्ये काही तफावत असल्यास त्याबद्दल खात्रीलायकपणे सांगता येत नाही. | सन २००९-१० पासुन प्रतिवर्षी मार्च महिन्यात सामुग्रीची प्रत्यक्ष तपासणी करण्याचे कंपनीने ठरविले आहे. |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | अ) | आम्हांला मिळालेली माहिती व खुलासे यांच्या आधारे १९५६ च्या कंपनी कायदा ३०१ नुसार या कंपनीने कुठल्याही व्यापारी संस्थेला कर्जाऊ रक्कम दिलेली नाही. | वस्तुस्थिती |
| | ब) | कंपनीने कुठल्याही व्यापारी संस्थेकडून ज्याचे विवरण कंपनी कायदा १९५६, कलम ३०१ मध्ये दिले आहे अशा कुठल्याही व्यापारी संस्थेकडून कर्ज घेतलेले नाही. | वस्तुस्थिती |
| ४) | | आम्ही मिळवलेली माहिती व खुलासे यानुसार आणि या कंपनीचा व्याप्त व प्रकार इत्यादी लक्षात घेता कंपनी व्यवस्थापनाने (भांडारमाल इत्यादींची खरेदी किंवा स्थावर मिळकत, माल विक्री व सेवा देणे) याकरिता अंतर्गत नियंत्रण योग्य प्रकारे प्रस्थापित केले आहे.<br><br>याव्यतिरिक्त असे निदर्शनास आले की, चालु मत्ता व दायित्वाची जुळवणी आणि सभासदानुसार व काळानुसार यादी ठेवण्यात अंतर्गत नियंत्रण दुबळे दिसते. | सध्या चालु काळातील येणे व दायित्व यासंबंधी माहिती त्यांच्या कार्यकाला नुसार आणि त्यांच्या लेखा शीर्षकानुसार मिळू शकते. |
| ५) | | कंपनी कायदा १९५६ नुसार जी दफ्तरे, वही आहेत त्यात कंपनीने कुठलाही असा व्यवहार केलेला दिसत नाही जो कंपनी १९५६ च्या कलम ३०१ नुसार या दफ्तर मध्ये नोंदणे आवश्यक आहे. | वस्तुस्थिती |
| ६) | | कंपनी कायदा १९५६ च्या कलम ५८ (अ), ५८ (अअ) व कंपनी (स्वीकृत ठेवी) नियम १९७५ मध्ये दाखवलेल्या नियमानुसार या कंपनीने कुठलेही ठेवी जनतेकडून स्वीकारली नाही. आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार कंपनीविरोधात कोणतीही सुचना (ऑर्डर) कंपनीकायदा मंडळ, राष्ट्रीय आस्थापना कंपनी कायदा न्यायालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया किंवा अन्य कोणत्याही इतर न्यायालयाकडून जारी करण्यात आलेली नाही. | वस्तुस्थिती |

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | | आमच्या मते व मिळालेल्या माहिती आणि खुलाशानुसार कंपनीमध्ये प्रचलित असलेली अंतर्गत हिशेब तपासणी पध्दत ही कंपनीच्या व्यवसायाच्या व्याप्त आणि स्वरूप यांच्या प्रमाणात अपुरी आहे आणि अत्यंत अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने चालू आहे, त्यामुळे त्यांच्या तपासणीची व्याप्तीही अपुरी दिसून आली. याशिवाय कंपनीने अंतर्गत हिशेब तपासणीसाठी बाहेरील व्यवसायिक सनदी लेखापाल संस्थेला नेमले असून अंतर्गत हिशेब तपासणी व्यवस्था मजबूत होण्याच्या अपेक्षा आहे. | कंपनीमध्ये स्वतंत्र अंतर्गत हिशेब तपास खाते आहे व त्याचे प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक आहेत. हेच अंतर्गत हिशेब तपासणी खाते, बाहेरील क्षेत्रिय कार्यालये यांचेही हिशेब तपासते. अंतर्गत तपासणी विभागाशिवाय इतर कार्यविभागातही अंतर्गत नियत्रंण पद्धती अस्तित्वात आहे. जसे खर्चाच्या प्रस्तावाची छाननी, निविदांची तपासणी, पुरवठा दारांच्या देयकांची तपासणी इ. याशिवाय व्यावसायिक लेखापालांच्या संस्थांना अंतर्गत तपासणी करिता नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| ८) | | कंपनीचे हिशेब तपासणी संबंधीची रजिस्टरे, बुके ही आंम्ही पूर्णत: केंद्र सरकारच्या नियमानुसार तपासली आहेत. कंपनी कायदा १९५६, कलम २०९ (आई) (डी) यांचे अंतर्गत येणाऱ्या पद्धतीनुसार आम्ही त्यांची तपासणी करून त्यातील मूल्यासंबंधीच्या नोंदी माहिती करून घेतल्या आहेत. आमच्या मते सर्वसाधारणत: या सर्व नोंदी कायद्यानुसार योग्य अशाच आहेत. तथापि आम्ही या नोंदीचे विश्लेषण करून त्या तंतोतंत असल्याची खात्री केलेली नाही. | वस्तुस्थिती |
| ९) | अ) | आम्हांला मिळालेल्या माहितीच्या आधारे असे दिसते की, कंपनी सरकारी तिजोरीत भविष्य निर्वाह निधी, व गुंतवणूकदार शिक्षण कर, संरक्षण निधी, कर्मचारी राज्य विमा योजनेच्या रकमा, आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सेवाकर, जकात निधी, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क कर व इतर सरकारी रकमा योग्य वेळी, योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यांकडे/तिजोरीत जमा करीत असते.<br><br>आंम्हाला देण्यात आलेल्या माहिती व खुलाशानुसार, कंपनीच्या ताळेबंद संपल्याचा दिनांकापासुन कंपनीने कोणतेही अपवादग्रस्त आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सेवाकर, सीमाशुल्क, उत्पादनशुल्क ६ महिन्या अधिक थकबाकी ठेवलेली नाही. | वस्तुस्थिती |

<table>
<tr><td></td><td>ब)</td><td>कंपनीकडील नोंदीनुसार आयकर/विक्रीकर/सेवाकर/जकातकर संपत्तीकर/उत्पादन शुल्क इत्यांदीच्या भरण्याची थकबाकी ठेवलेली नाही शिवाय अशा कर भरण्याविषयी कुठल्याही देयक रकमा त्याबद्दलच्या वादाअंतर्गत थकलेल्या नाहीत, केवळ.
<table>
<tr><th>कर प्रकार</th><th>न भरलेली रक्कम (रु. लक्ष)</th><th>वाद कुठून चालू आहे</th></tr>
<tr><td>उत्पादन शुल्क</td><td>१८६.६६</td><td>केंद्रीय उत्पादन शुल्क आयोग</td></tr>
<tr><td>आयकर २००६-०७</td><td>२५,८७५.००</td><td>आयुक्त (अपील)</td></tr>
</table>
</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>१०)</td><td></td><td>कंपनीच्या हिशेबात कुठलाही वाढत गेलेला तोटा (ॲक्युमलेटेड लॉस) या वर्ष अखेरीच्या हिशेबात आढळला नाही. कंपनीने कुठलाही रोख तोटा या वर्ष अखेरीला केलेला नाही किंवा येणाऱ्या आर्थिक वर्षाच्या काळासाठी असा तोटा दिसून आला नाही.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>११)</td><td></td><td>आमच्या हिशेब तपासणीनुसार आणि व्यवस्थापनाकडून आंम्हाला मिळालेल्या माहितीनुसार, आमचे असे मत आहे की कंपनीने कोणत्याही वित्तिय संस्था, बँक व ऋण पत्रधारकांच्या रक्कमा किंवा परतावा थकवलेल्या नाहीत.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
<tr><td>१२)</td><td></td><td>समभाग, ऋणपत्र इत्यादी प्रकार तारण ठेवून आमच्या माहितीप्रमाणे कंपनीने कुणालाही कर्ज, अग्रीम रक्कमा वगैरे दिलेल्या नाहीत.</td><td>वस्तुस्थिती</td></tr>
